किरकोळ अंकास .... .... .... ०४
नोटिशी बद्दल.
ओळीस आंत रु० १
ओळीस .... ०।०६
दुसरे खेपेस .... .... ०१

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

Single copy... ... ... ... ...4 as.

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs.
Per line over 10 ... 4 as.
Repetition Per line 3 as.

VOL XXIX AKOLA MONDAY 7 OCTOBER 1895 NO 39

वर्ष २९ आकोला सोमवार तारीख ७ माहे आक्टोबर सन १८९५ इ० अंक ३९

## किंमत पाउणपट केली

वासुदेव चिंतामण बापट वकील आद्य वनस्पती वैद्य याची शुद्ध वनस्पतींचीं औषधें

खाली लिहिलेले सर्व प्रकारचे पांक पक्या शेरास तीन रुपये प्रमाणें.

बालरोग निवारक चूर्ण— किं. तोळ्यास. ०८



पत्ता
वासुदेव चिंतामण बापट
वकील म्हाळजन.
मु० नारिंग्रे.
ता. देवगड.
जि. रत्नागिरी.

१ मदन विलास पाक—नपुंसकत्व दूर करणारा
२ दावानल पाक—सर्व प्रकारचे वायुवर.
३ वधु भूषण पाक— सर्व प्रकारचे प्रदरावर.
४ सालंमिश्री पाक, मुसळी पाक, बदाम पांक भुय कोव्हाळे पाक— उत्तम पौष्टीक.
५ बाळंत रोग विक्षय रोगावरील— ४२ दिवसांत गुण येतो.
६ आम्लपित्त पोट शुळावरील पाक—८ दिवसांत गुण.
७ मधुमेहावरील पाक—४० दिवसांत गुण.

अन्य औषधें

८ अकडी वरील गोळ्या— डबीस किं. रु. २
९ डब्या वरील गोळ्या— डबीस किं. रु. १॥
१० दम्या वरील गोळ्या- डबीस किं. २०४
११ दम्या वरील पुड्या—दर रुपयास २०
१२ अद्भुत चमत्कारिक वीर्यस्तंभक चूर्ण— तोळ्यास ०३ आणे.
१३ सर्व रोगा वरील गोळ्या-डबीस किं. रु. १
१४ उपदंश शामक गोळ्या— डबीस किं. रु० २०४
१५ वात विध्वंसक तेल—सर्व वायुवर पावशेराचे कुपीस किं. २०१०
१६ उपदंशशामक मलम—डबीस किं. रु. १
१७ प्रमेहावरील गोळ्या— ८ गोळ्यास किं. रु० १
१८ शतपुटी ओवा— संधीवात, आमवात वगैरेवर किं. दर तोळ्यास ०६ आणे.
१९ शतौषधी मलम— रक्तपीती, व्रण वगैरेवर दर तोळ्यास किं० ०६ आणे.
२० बाळगुटीच्या गोळ्या— मुलाची प्रकृती चांगली राहून आगडी डबा-वगैरे होत नाही. किं. दर तोळ्यास ०१२ आणे.
२१ रक्त पीती वरिल औषध— तोळ्यास किं० रु० १०८
२२ नेत्र रोगावरील काजळ— डबीस किं० रु० ०१२ आणे.
२३ प्रवाळ भस्म—पित्त विकारावर किं. दर तोळ्यास रु. ०१२ आणें.
२४ खोकल्या वरील गोळ्या— डबीस किं. ०१२ आणे.
२५ पाचक गोळ्या—अन्न पचन होऊन क्षुधा वाढते ३० गोळ्याचे डबीस किं० रु. १
२६ कुडे पाक— संग्रहणी, पांडु यांजवर ३० गोळ्याचे डबीस रुपया १.
२७ पटकी वरील फळें—दर रुपयास २०
२८ वाकेरीचें भातें—दर रुपयास तोळे १०
२९ तापाच्या गोळ्या—सर्व ज्वरावर डबीस किं. ०१२ आणे.
३० रक्त शुद्धीच्या गोळ्या— दर रुपयास डब्या २
३१ स्तंभक, कामोत्तेजक सुवर्ण कस्तुरीयुक्त संजीवनी गुटीका—डबीस किं० रु० १
३२ वनौषधी गुटीका— भ्रमण पीतावर व मस्तकांतील कडकीवर किं. रु. १
३३ व्रणावर औषध— किं. रु. ६
३४ भगेंद्रवळासुर यांजवरील औषध. किंमत रुपये ७
३५ प्लीहा गुल्म या वरील औषध किं. रु. ६
३६ बहुमुत्रा वरील औषध—किं० रु० १०
३७ कामले वरील औषध—किं० रु. ५
३८ धातुक्षय, उरक्षत, पाडु यांजवरील औषध किं. रु. १५
३९ गंडमाळे वरील औषध—किं. रु. ७
४० श्वेत कुष्टावरील औषध किं. रु. ३०
४१ कर्ण रोगनाशक तेल—दर कुपीस रु. १
४२ दाताचे मंजन—सर्व मुख रोगावर किं० दर तोळ्यास आणे ०३
४३ रक्त मुळ व्याधी वरील मलम व मुळी दर तोळ्यास किं. ०१२ आणे.
४४ वृश्चिक दोषा वरील औषध— तोळ्यास किं० ०१२ आणे.

वरील औषधें व अन्य सर्व रोगा वरील औषधें आणि वनौषधी प्रकाश, गरमीचें पुस्तक, सुषेण चिकीत्सा; गरीबाचा वैद्य. बाल वैद्य, गुराचा वैद्य हीं पुस्तकें सहितील पत्यावर आह्माकडे मिळतील.

सावर्गीची सुचना

आमचे कारखान्यांत काम केल्याचें लिहून कोणी ही आमचे औषधांची जाहिरात दिली तथापि त्यांशी आमचा कोणच्या ही प्रकारचा संबंध नाहीं. ह्मणुन ती आमची असें समजून घेऊन फसूं नये. व खरी माहिती अह्मी कोणासही दिली नाहीं. आमचा खरा माल आह्माकडेसच सहितील पत्यावर मिळेल.

प्रकृती मान कळविलें असतां निदान करून योग्य औषधाची योजना करणेंत येईल.

वासुदेव चिंतामण बापट वकील
मु० नारिंग्रे.
ता० देवगड
जि० रत्नागिरी.

## जाहिर खबर

बाहेर गांवच्या सर्व व्यापारी लोकांस कळविण्यांत येतें कीं; आमची पेढी मुंबईत. फार दिवसांपासून चालू असुन आह्मी पुष्कळ फायद्यानें माल खरेदी करून पाठवित असतों. ज्या व्यापारी लोकांस भुसारी, कापड, फरनीचरचें जातीचें सामान, लांकूड, लोखंड, किराणा, हार्डवेर ( चुका, स्क्रू वगैरे ) स्टेशनरी व ग्यासलेट वगैरे कोणत्याही जातीचा माल मागणें झाल्यास आह्मी पुष्कळ फायद्यानें आणि कमीशनें व त्वरित पाठवूं. एक वेळ माल मागविल्यावर खात्री होईल. आमच्या कमिशनचा भावही फारच कमी ह्मणजे शेकडा एक टक्या प्रमाणें आहे. माल मागविणें तो व्ह्याल्यू पेबलनें अगर आगाऊ रुपये पाटवुन मागवावा. पण व्ह्याल्यू पेबलनें माल मागविणारांनीं शेकडा २५ रुपये प्रमाणें रक्कम आगाऊ पाठविली पाहिजे. ज्या लोकांस माल मागविणें असेल त्यांनीं खालील पत्यावर आपलें नांव, गांव, स्टेशन वगैरे स्पष्ट खुलासेवार लिहून पत्रव्यवहार करावा. पत्रें पोस्टपेड पाठवावीं व उत्तराकरितां टिकीट पाठवावें.

**तईयब अली मुलावली भाई.**

मच्छी बाजार, अबदुल रहिमान स्ट्रीट. मुंबई.

## जाहिरात

स्कुल ड्रिल किं० ०१० आज्ञाशब्द मराठी व इंग्रजी उच्चारासह मुंबईत पेतदार यांजकडे अगर आह्मांकडे.



गोविंद भा. ओक
सदर बाजार, सोलापूर

नंबर १४३

कोणी स्थावरपन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्या साठी सरटीफिकिट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टांस अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८८९ चा अक्ट ७ कलम ६ प्रमाणें.

दिवाणी क्लास १५ मिसल नंबर ४ —— १८९५

विद्यमान सिव्हिल जज्य साहेब जि० अकोला यांचे कोर्टांत.

नांव रामजी
बापाचें नांव लक्षमण
राहणार चरणगांव तालुके बाळापूर जिल्हा अकोला यांस मयत

लक्षमण बापाचें नांव ह्मसाजी राहणार चरणगांव तालुका बाळापूर जि० आकोला यांचें कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून सदहू अर्जदार यानें अर्ज केला आहे त्याज करितां सदरहू मयत मनुष्याचे मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्यांणीं तारीख १२ माहे अक्टोबर १८९५ इसवी रोजीं सदहू अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपआपले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

तारीख २६ माहे सपटंबर सन १८९५ इ०

V. N. Dandekar.

सिव्हिल जज्ज.

वऱ्हाडसमाचार

मित्ती आश्विन वद्य ३ शके १८१७

## दिवाणी न्यायखातें

एकंदर ले दावे निकालास लागले त्या पैकी तक्रारीचे एकंदर दावे सरासरीनें १३२.४ दिवसांनीं व बिनतक्रारीचे दावे ६०.४ दिवसांनीं निकालास लागले. प्रत्येक दावा चालण्याचीही मुदत पूर्वीच्या पेक्षा अधिक आहे हा विलंब लागण्याची कारणें बहुत आहेत इलिचपूर जिल्ह्या संबंधानें मोकदमें लांबणीवर पडल्याची मोठी ओरड होती आणि ह्मणूनच मि. माणिकशा यांस मुद्दाम तिकडे धाडलें होतें आणि त्यांनीं पुष्कळ जुने काम आटोपून टाकलें. आकोला आणि उमरावती येथील सिव्हिल जजमांच्या दप्तरीं पुष्कळ जुने खटले होते पण ते समाधानकारक रीतीनें थोडे बहुत चालले होते अशी जुडिशिअल कमिशनर यांची समजुत आहे. जुने दावे अद्याप तसेच का चालू आहेत या विषयीं पुष्कळ अडचणी सिव्हिल जजमांनीं दाखविल्या पण त्याच्या मध्यें मि. बुळक यांस कांहीं अर्थ दिसत नाहीं. मानहानीच्या मोकद्दम्यांत कातरता आणि न्यायसंशोधना विषयीं संशयखोरपणा हीं अधिक दृष्टीस पडतात आणि विलंब लागण्याचें हेंच कारण असावें. मि. बुळक ह्मणतात कीं आमचे सिव्हिल जज्ज काम कसून करितात आणि तें अंतःकरणाच्या कळकळीनें करितात तथापि त्यांच्या अंगीं मि-

त्रेधणा व अनिश्चितपणा फार वास करितो आणि त्यामुळें दावे आजचे उद्यावर जात जात पुष्कळ दिवस पर्यंत लांबतात. मि. बुलक ह्मणतात कीं खऱ्या विचारांत घेण्या सारख्या तक्रारी ज्या दाव्यांत असतात असे दावे फार थोडे असतात आणि ह्मणून वरील सरासरीच्या मुदतीचें प्रमाण भारी आहे.

सन १८९४ सालीं ३९२१७ दाव्यांचा निर्णय झाला त्यांची कोर्ट फीसाठीं लाविलेली किंमत गोळा बेरजेनें रुपये ४०,५३,१६६ १४ आणे ४ पै होते. १८९३ पेक्षां ही किंमत ८ लक्ष रुपयांनीं वाढली. प्रत्येक दाव्याची सरासरी किंमत रु. १३५-३-१ पडते आणि प्रत्येकाचा सरासरी कोर्ट खर्च रुपये १६-१३-५ पै पडतो आढळे, वर्षा पेक्षां दाव्याच्या किंमती व खर्च हीं वाढलीं आहेत याचें कारण रिपोर्टाच्या वर्षी ५०० रुपये किंमती पासून ५००० रुपये किंमती पर्यंतचे दावे १८९३ सालांपेक्षां अधिक आले. कोर्ट फी व प्रोसेस फी याचे उत्पन्नाची एकूण रक्कम रुपये ५०१,१२०-११ आणे झाले; या पैकीं प्रोसेस फीचें उत्पन्न १,१२,३८२ रुपये होऊन प्रोसेसी बजावणाऱ्या खात्या साठीं ६४६५१ रुपये खर्च झाला. तेव्हां प्रोसेस फीची बरीच शिल्लक सालोसाल सरकारच्या तिजोरींत जात आहे. पण सरकारनें असा फायदा करून घेणें न्यायाला संमत नाहीं ह्मणून मि. बुलक यांचा विचार प्रोसेस फी कमी करण्याचा आहे आणि आह्मी आशा करितों कीं मि. आबर्ड साहेब आपल्या मागी अधिकाऱ्याचा विचार लवकरच अमलांत आणितील.

अंमल बजावणी साटीं एकंदर ३३५४२ अर्ज झाले त्या पैकीं २७४३५ अर्जांचा निकाल लागला. पुष्कळ अर्जांत अंमलबजावणी झाली नाहीं, याला कारण असें कीं कांहीं अर्ज नुसते अंमलबजावणीचा हक्क मुदतीच्या कायद्यानें जाऊं नये ह्मणून होते आणि कांहीं मध्यें ऋणको निर्धन होते व हुकूमनाम्याची फेड होण्यास त्यांच्या जवळ साधनें नव्हती. निव्वळ पैशाचे असे हुकूमनामे रुपये ३,३५,३५५।०।९ पैचे होते त्यांचा वसूल कुळाकडून व सरकारी जप्ती वगैरे मार्गांनीं झाला. स्थावर मालाच्या जप्त्या १५१७ झाल्या. पण त्या पैकीं शेंकडा ६४.२ प्रमाणानेंच जप्तीतर्फे इस्टेट हरासानें विकली गेली.

यंदा राष्ट्रीय सभा पुण्यास भरणार आहे आणि पुण्याच्या मंडळीमध्यें फाटाफूट विलक्षण आहे तेव्हां हा समारंभ कसा काय पार पडतो अशा विषयीं मोठी चिंता उत्पन्न झाली होती पण अलिकडे तिकडील वर्तमानपत्रांतून जे लेख आले आहेत त्यांच्या आधारें आह्मास खात्री वाटते कीं राष्ट्रीय सभेच्या व्यवस्थेला कांहीं कमी पडणार नाहीं. सामाजिक परिषद् राष्ट्रीय सभेच्या मंडपांत भरूं देऊं नये अशा विषयीं नवीन वाद पुणेकरांनीं उपस्थित केला आहे पण त्याचा कांहींही निकाल झाला तरी राष्ट्रीय सभेस बिलकूल धक्का पोंचणार नाहीं. या बद्दलची टंट आश्वासनें वाचून आह्मास जरा आवेक धीर आला. काळजीचें निवारण झालें ही गोष्ट उत्तम होय.

राष्ट्रीय सभेची तयारी कडेकोट चालू हें कळविण्यास परम संतोष वाटतो. पुण्याच्या चतुःशृंगीच्या मैदानांत पंधरा एकर जमीन भाड्यानें घेतली आहे आसपास ५०० पाहुण्यांस पुरतील इतके बंगले व्यवस्थापक कमिटीनें राखून ठेविले आहेत. एक मंडप व रमणीय मंडप तयार होत आहे आणि त्यांत सात हजार लोक मावतील असा अंदाज आहे. व्यवस्थापक कमिटीनें वर्गणी जमाविण्याचें काम झपाट्यानें चालविलें आहे. एकंदर फंड ४० हजार रुपयांचा पाहिजे. त्या पैकीं पुणे भागांतून १० हजार, मुंबई भागांतून १५ हजार, आणि गुजराथ व दाक्षिण प्रांत मिळून सर्व भागांतून १५ हजार अशी ४० हजार रुपये फंडाची जमवाजमव चालू आहे. पुणेकरांनीं ७००० रुपये वसूल केले आहेत आणि मुंबईकडेही वर्गणीचें काम चांगलें चालू आहे. गुजराथेंतलें काम अगदीं मंद आहे पण गुर्जरस्थ मंडळी ऐन वेळेवर जाणीं राखतील अशी पूर्व गोष्टीवरून लोकांची खात्री होईल. वर्गणीची योजना मोठी सुरेख केली आहे ह्मणजे राष्ट्रीय सभेची वर्गणी घरोघर वसूल करण्यांत येईल, तसेंच राष्ट्रीयत्वाचा प्रत्यक्ष दाखला सर्वांच्या लक्षांत येईल आणि वर्गणीची ही मोठी रकम लवकर व सहजी जमा होईल.

यंदा राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षस्थानीं कोणा लोकमान्य गृहस्थाची निवड करावी अशा विषयीं लोकांचे विचार नुकतेच बाहेर पडत आहेत विलायतच्या सद्गृहस्थाची निवड करावी असें ठरल्यास तीन नावें प्रसिद्ध झालीं आहेत. नामदार मार्ले, ब्लेक किंवा केन या तीन विद्वन्मध्या पैकीं कोणाची योजना करावी हें ठरवावें लागेल. पुण्याच्या बैठकीस मुंबई इलाख्या पैकीं कोणी लोकाग्रणी नेमूं नये असा आजपर्यंतचा सांप्रदाय आहे. कलकत्याचे सुप्रसिद्ध सर रोमेशचंद्र मित्र व बाबू मन मोहन घोस हीं नांवें लोकांच्या मनांत घोळत आहेत. पण मद्रास प्रांताला हा बहुमान देणें झाल्यास राजश्री आनंदाचार्लू, शंकर नायर इत्यादि गृहस्थ प्रसिद्ध आहेत. दुर्भंगाचे महाराजांचें नांव पुढें करण्यांत येत आहे आणि बहुतकरून या विख्यात गृहस्थाची निवड ही होईल. ठिकाठिकाणच्या कांग्रेस कमेट्यांचे अभिप्राय विचारण्यांत आले आहेत आणि ते कळे पर्यंत या प्रश्नाचा सध्यां निकाल लागत नाहीं.

इंदूर दरबारची स्थिति फार शोचनीय आहे. सध्यांची होळकरशाही बुडते कीं काय अशा थरावर गोष्ट येऊन पोचली आहे. टाइम्सच्या ह्मणण्या प्रमाणें श्रीमंत होळकर सरकारास सहा महिन्यांच्या मुदतीची रजा मिळाली आहे आणि तेवढ्या अवधींत सर्व राज्यकारभार सुयंत्रित व सरळ झालाच पाहिजे. दिवाण बहादुर खंडेराव चिमणराव बेदरकर यांचा राजिनामा नामंजूर ठरला आहे आणि त्यामुळें त्यांस इंदुरास परत येणें भाग पडलें. महाराज बाळासाहेब यांच्या ललाटरेषेची परीक्षा आतां होणार आहे. राजेबहादुर शुद्धीवर येऊन सांवरले तर पनेचीं गाऱ्हाणीं परमेश्वरानें ऐकिलीं असें होईल. नाहीं तर, भरतपूरच्या महाराजांची पदच्युती लोकांच्या डोळ्या समोर साक्षात् उभी आहेच! ईश्वर करो आणि या दुर्धर प्रसंगाची आवृत्ति होळकर संस्थाना संबंधानें न निघो!

इंडियन राष्ट्राला रबराची उपमा देतात. ह्मणजे संवर्धनता हा जसा रबराचा गुण आहे तसा इंडियन राष्ट्राचाही गुण आहे. इंडियांतील ब्रिटिश राज्याचा विस्तार दिवसें दिवस फैलावत चालला असून त्या राज्याचा परिघ नित्य संवर्धनीय आहे. क्षितीजाच्या ठिकाणीं जसें जमिनीला आकाश टेकल्या सारखें दुरून वाटेंत पण जवळ जाऊं लागलें ह्मणजे क्षितीज पुन्हा लांब पळतें तद्वत् ब्रम्हदेश, अबिसिनीया, आफगाणिस्थान, इजिप्त हे देश इंडियन राष्ट्राखालीं समाविष्ट केले तथापि या राष्ट्राची सीमा लांबती आहे आणि तिला कांहीं अंत नाहीं. या राष्ट्राचा परिघ नित्य पाण्यावरील वाढत्या बाह्य कक्षेंत लांबत जाणाऱ्या असंख्य वर्तुळाप्रमाणें अमर्याद आहे. वेदान्तांत जसा अद्वैतवाद आहे त्याप्रमाणें आमच्या राज्यकर्त्यांचा अद्वैतवाद म्हणजे राज्य विस्तार हा होय; पण या राजकीय बकवृत्तीमुळें किती राष्ट्रें स्वातंत्र्यसुखास आंचवतील, इंडियाच्या राज्याचे आधारभूत स्तंभ कसकसे डळमळतील आणीं अती तेवें माती हा अनुभव कसा येईल हें निराळें भविष्यकथन दूरदर्शी सुज्ञासाठीं नको!

# The Berar Samachar

MONDAY OCTOBER 7, 1895

We have to unlearn a good deal of the Mahratha history when we read the learned lecture of the Hon'ble Mr. Justice Ranade on Shivaji as a Civil Ruler. Old, hazy, and misguiding notions disappear at a glance over this new chapter of Shivaji's life. This piece-meal contribution to the history of the Mahratha nation amply illustrates the utter want of an accurate, impartial and ennobling account of a great epoch in the annals of this vast nationality. It is but a sure index to a grand historical work that we shall shortly have. Shivaji's plan of administration may be taken as the nursery of the present system of the English administration. In the eloquent words of the writer himself

"Shiwaji's system of Civil Government was distinguished from those which preceded it or succeeded it in several important respects:—1stly. In the great importance he attached to the Hill-forts, which were virtually the starting unit of his system of Government. 2ndly. In his discouragement of the hereditary system of transmitting high offices in one and the same family. 3rdly. In his refusal to grant Jahagir assignments of land for the support of Civil or Military officers. 4thly. In the establishment of a direct system of revenue management, without the intervention of district or village Zamindars. 5thly. In the disallowance of the farming system. 6thly. In the establishment of a Council of Ministers with their proper work allotted to them, and each directly responsible to the King in Council. 7thly. In the subordination of the Military to the Civil element in the administration. 8thly. In the intermixture of Brahmins, Parbhoos and Marhattas in all offices, high and low, so as to keep check upon one another. Of course some of these distinctive features could not be continued intact when the Mahratta power, instead of being confined to the small area of the Swarajya district, was extended in all directions so as to embrace provinces so distant as Cuttac on the east, and Katiawar on the west, and Delhi in the north and Tanjore in the south. In the Mahratta country proper, the nation, the army, the officers, and the kings were all of the same race, and a common bond of loyalty knit them together in a way which it was impossible to secure in distant parts of India, where the conquered population differed essentially from the army of occupation, and too often the army of occupation consisted of mercenaries who had no bond of union with their commanding officers, or with the representatives of the central power".

The present system of the English administration is 'digging its own grave'. So says Mr. A. J. Wilson in his graphic style. A similar picture drawn by Mr. Dadabhai Naoroji is worth studying and we present it below as promised last week:—

"And what do you think must be the ultimate result of such a policy? Mr. Harris asked.

"I prophesy," said Mr. Naoroji, earnestly and deliberately, "that this constant violation of pledges, this persistent opposition to Indian interests, and the deterioration and impoverishment of the country by an evil administration, must lead, sooner or later, to a rebellion. I hope I may prove a false prophet, but in the interests of the British Empire I say that forces are gathering, vast and powerful, which will succeed in shattering the British Indian Empire, if the present evil and destructive system of administration be not thoroughly reformed. The pity of it is that the British people and Parliament are genuinely desirous of promoting the interests of India and constituting it an integral part of the British Empire, but the Indian Authorities disobey their desires and stultify their wishes."

"Why should they do so? What interest can they have in so acting?"

"Simply in order to reserve to themselves the sweets of power and pay or, as one eminent Anglo—Indian expressed it, 'in order to provide for our boys.' The usual plausible excuse is that they think that the larger the number of Europeans in the service the safer India is. But this is a complete mistake, and will prove their chief Nemesis and retribution. Let us consider first the European civil services and population. They are scattered over a vast empire, and would be the immediate victims of any rebellion. The last mutiny furnished us with an object lesson in this respect. But the Indian Authorities won't learn by experience. Many a European owed his safety to the loyalty of the natives by whom he was surrounded. Then there are the military services. In such a contingency the civilians could not even depend on the native army for protection, because there is the possibility that the native army would side with their kith and kin. As for the European army, their duty would be divided between opposing the native army putting down the rebellion, and helping the Europeans—an impossibility. Lord Roberts has himself admitted that even were the army much larger than it is at present, and even were it perfection itself, the safety of British rule would nevertheless depend entirely on the satisfaction of the people.

"There is one further element of danger," continued Mr. Naoroji. "Suppose that while some such trouble as this was brewing Russia which is on the other side of the hedge, were to

seize her opportunity to strike a blow at England. What would be easier? Indeed, the Indian authorities are doing every thing in their power to tempt Russia to invide India, both by their policy of dissatisfying the Indian people with their rule, and by making an easy road for Russia though the mountais of Afghanistan at our expense. Depend upon it, the 'Forward' policy is a suicidal one. By penetrating to Afghanistan we only bring ourselves the nearer to Russia, and Russia nearer to ourselves."

"What then do you consider would be a wise policy to pursue with regard to India?"

"To satisfy her with the justice of British rule, to be honest and honorable in all our solemn pledges, and thus to make Indians feel that to fight for the British rule is to fight for their own hearths and homes and property. With Indian subjects of such a temper you could defy half-a dozen Russias. Another most important point, which is not understood in England, is this: that the effect of a large European service is to impoverish the Indian people both financially and intelectually. For not only do retired servants carry their pensions and savings clean out of the country, but the country is drained of its wisdom and experience. We have no elders left to guide us. A third point is that we should keep within India proper. The river Indus and the mountains of Afghanistan are our natural protection against all enemies It is as if Nature her self had planted them there for that very purpose of protecting our Empire. Last, but not least, every expenditure of every kind is thrown upon India, while the Britain does not contribute a farthing to it in return for the vast benefits she derives from connection with that country. Do you think that the Indians are not keenly alive to this degradation, this 'slavery' as Macaulay very justly called it? To me it is well nigh inexplicable how British statesman can continue so blind to the common-sense dictates of righteousness, so untrue to their own honourable character, and so unyielding to the demands of civilization".

## वऱ्हाड

हवामान– अलिकडे थंडीची झांक पडूं लागली आहे. पावसाळा संपून हिंवाळ्यास आरंभ झाला असें वाटतें. रुग्यां पिकें चांगल्या स्थितींत आहेत. किरकोळ रोगराई वातावरणांतील फरकामुळें पुष्कळ कमी आहे.

रा. आबर्ड साहेब जुडिशिअल कमिशनर यांचें कोर्ट आक्टोबर अखेर बंद राहील. साहेबांची स्वारी गुरुवारीं अकोल्यास आली. नक्कलनवीस खात्याचें इनस्पेक्शन मोठ्या कसोशीनें झालें. आज रोजीं वाशिमच्या कचेरीची तपासणी होणार आहे.

मि. एन गाढफ्रे, वकील, उमरावती यांजवर मि. अनिजुद्दीन माजिस्ट्रेट वर्ग १ उमरावती यांनीं वकिलीच्या कायद्याच्या विरुद्ध वर्तन केल्याबद्दल नोटीस काढून विचारलें होतें कीं सनद रद्द करण्याबद्दल हायकोर्टाकडे कां रिपोर्ट करूं नये. परंतु या नोटिशी संबंधानें मि. गाडफ्रे यांनीं हायकोर्टाकडे अर्ज केल्यावरून मि. आबर्ड साहेब यांनीं सर्व प्रकरण लक्ष्यांत घेऊन दूरदृष्टीनें मि. अनिजुद्दीन यांस हुकूम केला कीं आमच्या हुकुमा खेरीज या प्रकरणांत माजिस्ट्रेटांनीं हात घालूं नये. झाली गोष्ट बरी झाली; नाहीं तर बिचाऱ्या सुशील गृहस्थाची पुष्कळ अप्रतिष्ठा होणार होती!

मि. प्रिडो यांस असिस्टंट सिव्हिल सेशन जज्ज नेमल्या कारणामुळें त्यांच्या हाताखालीं एक ५० रुपयाचा हेडक्लार्क, ३३ रुपयाचा दुय्यम क्लार्क एक नक्कलनवीस व दोन शिपाई इतकी कामगार मंडळी देण्यांत आली. वरील ५० रुपयावर रा. रा. बापूराव बाळकृष्ण बापट यांस नेमण्यांत आलें आहे.

रा. रा. बाळाजी राजाराम काळे क्लार्क आफ कोर्ट निसबत जुडिशिअल कमिशनर हे नोवेंम्बर पासून तीन महिन्यांच्या हक्काच्या रजेवर जाणार आहेत आणि त्यांच्या रजेंत रा. रा. मारुती हरी, क्लार्क आफ कोर्ट–सेशन कचेरी यांस नेमणार आहेत ही गोष्ट आनंदाची होय.

सबरजिस्टार व मोहरीर यांची परीक्षा उमरावती येथें तारीख ३ रोजीं झाली. व उमेदवार १३ हजर होते त्या पैकीं ९ पास झाले.

मि. निकोलेट डेपुटि कमिशनर, उमरावती हे रजेवरून परत आले आणि मि. प्रिडो यांस असिस्टंट सिव्हिल आणि सेशन जज्ज तूर्त नेमण्यांत आलें आहे. अपिलेट कोर्टाचा अधिकार अशा अनुभव कमी असलेल्या व कच्च्या कायदे पंडिताकडे सोंपविला आहे तथापि मि. प्रिडो आपली नेमणूक योग्य ठरवून घेतील अशी आशा आहे.

क्याप्टन कोलब असि. कमिशनर, औरंगाबाद यांस बुलढाण्यास डेपुटि कमिशनर नेमल्याचें वर्तमान कळतें.

वाशिमाहून एक गृहस्थ कळवितात कीं तेथील कांहीं अधिकारी संबंधानें कालवा चालला आहे. कोणी कोणाचें तरी नांव घेतो, आणि एकमेक दोष परस्परावर लादतात. एका काढून टाकलेल्या शिपायानें दुसऱ्या कोणाची बायको पळविल्याचेंही प्रकरण उपस्थित आहे.

यंदाच्या वकिलीच्या परीक्षेंत रा. रा. वामन रामचंद्र गोखले हे एकटेच विद्यार्थी पसार झाले. हा निकाल नुसता लिहिला म्हणजे परीक्षेच्या फार्साची चांगली अटकळ होईल.

रा. रा. रंगराव नारायण मोहोळकर यांस बुलढाणाहून बदलून मेहकर तालुक्यांत ५० रुपये पगारावर सब-ओव्हरसिअर नेमिलें. नेमणूक चांगली झाली.

रा. रा. लक्ष्मण गोपाळ देशपांडे यांस ७५ रुपये पगाराच्या नायब तहशिलदारीवर कायम करण्यांत आलें हें कळविण्यास आनंद वाटतो. त्यांचें येथील आक्टींग तहशिलदारीचें काम चांगलें लोकप्रिय होत आहे तेव्हां ते लवकरच तहशीलदारीवर कायम होतील अशी उमेद आहे.

रा. रा. लक्ष्मण माधव देशपांडे, नायब तहशीलदार, मल्कापूर यांस कायमची ७५ रुपयांची पाहिले वर्ग नायब तहशिलदारी मिळाली हें लिहिण्यास परम संतोष वाटतो. पेनशन जवळ पोचलेल्या गृहस्थाची बढती झाली हें विशेष श्रेयस्कर होय.

तारीख १३ जून पासून कर्नल स्पान्सकी यांनीं पेनशन घेतलें ह्मणून त्या मिती पासून खालील बढत्या देण्यांत आल्या:–

| नांव | डेपुटी कमिशनरचा वर्ग |
|---|---|
| कर्नल लडलो ( बाह्य प्रांतीं ) | १ ला. |
| मि. निकोलेट | १ ला. |
| मि. हनत्राप ( बाह्य प्रांतीं ) | २ रा. |
| मि. हेअर | २ रा. |
| मि. गाडविन आस्टिन | ३ रा. |

क्याप्टन ग्यारेट स्पेशल असिस्टंट कमिशनर

मि. बिडल्फ सिकंदराबाद छावणी माजिस्ट्रेट हे रजेवर जात असल्यामुळें वऱ्हाडांतून लेफ्टेनंट मारिस यांस तिकडे बदललें.

येत्या १५ व्या तारखेला मि. फ्रीडन हे रेसिडेंटच्या जागीं रुजूं होतील असें कळतें.

---

नमुना ( जी )

नादारी मुकदमा नंबर २६ सन १८९५

विद्यमान नादारी कोर्टाचे जज्ज जि० अकोला.

सर्व धनको यांसः—

नोटीस देण्यांत येते कीं, धनामल वा मोनामल अगरवाले राहाणार माळेगांव तालुके अकोट हा नादारी आहे असा आज तारीख २१ माहे ९ सन १८९५ इसवी रोजीं ठराव झाला आहे. आणि तारीख १० माहे अक्टोबर सन १८९५ हा दिवस नादाराचे सावकारांनीं नेमण्या करितां आणि सावकारांनीं आपले तर्फेचा असायनी नेमून देण्या करितां व नादारानें आपल्या सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा निकाल करण्या करितां नेमला आहे.

नादाराच्या सुटके संबंधीं ज्या सावकाराची तकरार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्याबद्दल आठ आण्यांच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटिशींत ज्या आधारावरून तकार सांगणें असेल ते व त्या बदल ज्या साक्षीस समन्स करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांवें नमूद करावीं. ही नोटीस नेमण्या करितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वी दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पहाण्या करितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत. ज्यास नादारावर दावे नोंदविणें असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी व ते दावे खरे असल्या बदलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्याजवर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे राहणारे असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशियल आफिसरापुढें तिच्या खरेपणा विषयीं शपथ लिहावी आणि ती यादी टपालाकडून कोर्टांत पाठवावी. ह्मणजे दावे रजिस्टरांत दाखल होतील. कळावें ता. ४।१०।१८९५ इ०

B. B. Sule.
Judge
Bankruptcy Court.
Akola District.

---

पंजाब नादारी मुकदमा नंबर ७

——

१८९५

विद्यमान नादारी कोर्टाचे ज्यडज्य साहेब बहादूर जिल्हे बुलढाणें याचे कोर्टात.

सय्यद रहिमान वल्लद सय्यद सुलतान मुसलमान राहणार कसबे लोणार तालुके मेहेकर जिल्हे बुलढाणें. नादार.

वरील नादार यानें आपणास नादार ठरविण्या विषयीं आमचे कोर्टांत अर्ज दाखल केला आहे व त्या अर्जाचे चौकसीची तारीख २९ माहे आक्टोबर सन १८९५ रोजीं बुलढाणें येथें नेमली आहे तरी त्याजला नादार न ठरवूं देण्याविषयीं ज्यांच्या हरकती असतील त्यांनीं वरील तारखेस आमचे कोर्टांत बुलढाणें येथें सकाळीं दाहा वाजतां हजर व्हावें.

आज तारीख २ माहे आक्टोबर सन १८९५ इसवी.

Maniksha Rattonji Dastur
नादारी कोर्टाचे ज्यडज्य.
जिल्हे बुलढाणे.

---

नोटीस

रा. रा. ताराचंद वल्लद शिवनारायण मारवाडी व जीवनराम मारवाडी राहणार शेगांव यांस नोटीस देणार तुकाराम वल्लद विष्णाजी बकाल राहणार लोहारे तालुके बाळापूर यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मांस आह्मी लोहारे येथील जंगलांतील माझे खात्याचीं शेतें २ दोन रुपये १५०० पंधराशेस खेरेदी करून दिली व खेरेदी कागद रजिस्टर करून दिला नाहीं. या गोष्टीस अदमासें अडीच वर्षे होत आलीं तुह्मास आह्मी सदरील शेतें दोन २ खेरेदी दिलीं त्याचा करार असा आहे कीं रुपये १२०० तुह्मी हरी इधोड कसोरेकर यांस द्यावेत व त्याची पावती आणून द्यावी व माझा जावई नामे गिरमाजी कुटे राहणार लोहारें याचें शेत डोंगरगांवचें जंगलांतील सोडवून द्यावें अशा करारानें तुह्मांस सदरील दोन शेतें दिलीं परंतु तुह्मी कराराप्रमाणें कांहीं एक केलें नाहीं व मजला माझे शेतांतून हाकून लाविलें. माझे शेतांत मी कपाशी पेरिली आहे. ती पांच टिफनची पराठी आहे व एक वावर रब्बीस तयार करून ठेविलें आहे तुह्मी मजवर मोंगलाई करून मजला माझे शेतांतून हाकून दिलें आतां तुह्मांस असें कळवितो कीं ही नोटीस पावल्या दिवसापासून आठ दिवसाचे आंत सदरील कराराप्रमाणें हरी इधोड कसोरेकर यास रुपये १२०० व माझे जावयाचें डोंगरगांवचें शेत सोडवून द्यावें असें झालें नाहीं तर मजला आजपावेतों जी नुकसानी झाली ती व पुढें होईल ती व माझे कबजांतील पराठीचें शेत व रब्बीस तयार केलेलें शेत व तुह्मी खरेदी शेतें दोन घेतली त्याचे रुपये १५०० व त्याजबद्दल निकाल होईपर्यंत व्याज व ह्या नोटिशीचा खर्च अखेर निकाल होईपर्यंत जें नुकसान होईल तें सर्व भरून घेईन मी तुमचें जें देणें असेल त्याजबद्दल मोक्ष वांत चार पंचास आणून दाखवावे व खात्री करून रुपये जे निघतील ते मी देण्यास तयार आहे. जीं दोन शेतें तुह्मास मी दिली व त्याजबद्दल खरेदी कागद करून दिला तो ह्या वेळपर्यंत पोकळ आहे. ह्मणून दिली नोटीस तारीख ३ माहे आक्टोबर सन १८९५ इसवी.

सही
तुकाराम वल्लद विष्णाजी बकाल राहणार लोहारें तालुके बाळापूर. दस्तूर विठोबा वल्लद रावजी पाटील डोंगरगांवकर

---

## वर्तमानसार.

औंध येथें तळ्यांत तक्ता ठेऊन त्यावर कांहीं मंडळीसह नाच चालला असतां, तोल बिघडून मंडळी तळ्यांत पडली. कांहीं पोहून व कांहींकांस ओढून काढण्यांत आलें. पण नाचणाऱ्या दोघी नायकिणी ठार झाल्या.

ठिबाच्या झाडाच्या सालीचे दोर चांगले होतात. तसेंच केळींचे सोपटें सोलून तीं वाळविल्यानें त्यांचेही चांगले दोर होतात.

कल्याकवर्ड नांवाच्या एका पक्षाच्या छातीचें हाडूक कढून, तें एका नाक कापलेल्या गेलेल्या स्त्रीच्या नाकास जुळवून, सबंब नाक तयार केल्याचा दाखला, इंग्लंडांतील एका हास्पिटलांत घडला आहे. त्या स्त्रीला सदरहू नाकानें चांगला श्वासोच्छ्वास करितां येतो.

शिवण्याचा दोरा दांतानें तोडल्यापासून मोठा अपाय होतो. कारण, त्या दोऱ्याला जें मिश्रण लावण्यांत येतें त्यांत किंचित विषारी अंश असतो असें ह्मणतात.

आरमिनियाचे बाबतींत टर्कीशीं लढाई चालविण्यास रशिया व फ्रान्स यांनी स्पष्ट नाकबूली पडली. आतां इंग्लंड काय करितें तें पहाणें उरलें आहे.

आजारी मनुष्याच्या खोलींत सुगंधि फुलें ठेवणें चांगलें, असें ठरलें आहे.

आर्मेनियासंबधानें सर्व जोखीमदारी इंग्लंडावर पडली आहे. आतां इंग्लंड कसें वागेंत तें पहाणें आहे. 'खालें तर बांधील व टाकलें तर शापील' असें हें प्रकरण झालें आहे.

चीनच्या कॅंकियन प्रांताच्या सरहद्दीवर जबरदस्त दंगा माजला आहे.

जपानचा बादशहा येत्या उन्हाळ्यांत इंग्लंडला जाणार आहे.

कान्स्टान्टिनोपल येथें कालरा झपाट्यानें सुरू झाला आहे.

कोरिया देशांत असा सक्त कायदा आहे कीं, पुरुषानें रात्रीनें फिरूं नये व स्त्रियांनीं दिवसा फिरूं नये. हा कायदा मोठ्या सक्त रीतीनें पाळण्यांत येतो. त्यामुळें स्त्रियांना रात्रीं स्वतंत्रपणें फिरण्यास बिलकूल हरकत पडत नाहीं. दिवसा त्या गोशांत असतात.

गोव्यास देशी लष्करांतील बहुतेक शिपायांनीं बंडाळी उठविल्यामुळें, लिस्बन येथून लष्कर रवाना झाल्याची तार आली आहे.

मोरोको येथील राजधानी फेझ येथें इंग्रज वकील ठेवण्याची परवानगी झाली आहे.

चीनदेशांत पाद्री लोकांवर हल्ला करण्याचें काम अद्याप चालूच आहे.

अफगाण सरहद्दीचा विशेष बंदोबस्त करण्यांत इंग्रज सरकार गुंतल्यामुळें, तिकडच्या रानटी लोकांचीं मनें बिथरलीं आहेत. त्यांनीं आपापसांतील भांडणें सोडून देऊन एक होण्याची खटपट चालविली असून, ती बहुतेक सफळ झाली आहे व बहुतः येत्या हिंवाळ्यांत ते लोक लढाईस निघतील अशी बातमी प्रसिद्ध झाली आहे.

रशियाच्या दरबारांत हल्लीं जर्मन लोकांचें विशेष वजन पडत चालल्याचें कळतें.

इंदूरचें राज्य सुधारण्यासाठीं आणखी सहा महिनेपर्यंत दि. ब. बेदरकर यांस व्हाइसरायाकडून पुन्हा नेमण्यांत आलें असून, ते तिकडे रवाना झालें आहेत असें कळतें.

व्हाइसराय लार्ड एल्गिन हे येत्या उन्हाळ्यांत आपल्या जागेचा राजीनामा देणार असें इंग्लंडचें यार्कशायर पोस्ट नांवाचें पत्र ह्मणतें. कां?

ईस्ट इंडिया रेलवेवर युरोपियन टिकीट कलेक्टर असल्यानें स्त्री उतारकरूंना वरचेवर त्रास होतो; त्यापेक्षां ह्या जागीं विवाहित देशी पुरुष किंवा स्त्रिया यांची योजना करावी असा एक अर्ज कलकत्याच्या इंडियन असोसिएशननें बंगाल सरकारास केला आहे. अशी व्यवस्था सर्वत्र होणें जरूर आहे.

श्री. स. वि.

मानवी केंसांचा बाजार— फ्रान्समध्यें पिरीनीज पर्वताजवळ मोर्ली ह्मणून एक गांव आहे. त्या ठिकाणीं गरीब गुरीब शेतकऱ्यांच्या मुली बाजारांत जाऊन आपले केंस विकतात. बाजारांत मुली उभ्या रहातात व सौदा ठरला कीं अगोदर हातांत पैसे घेतात, व पुढें डोकें करितात. खरेदीदाराचे हातांत कातर असतेच तो चटाचट चटके घेऊन सर्व केंस कातरून काढितो.

डोक्यास औषध— पित्तानें डोकें दुखतें त्यास एका फ्रेंच वैद्यानें चमत्कारिक औषध काढलें आहे. एक विजेचा टोप डोकीवर ठेवावयाचा ह्मणजे डोक्यास मणमणूं लागतें व लागलीच झोंप लागते.

एडिसनचें घर— ह्या प्रसिद्ध पुरुषाचे घरीं सर्व कामें विजेनें होतात पाहुणा दाराजवळ गेला कीं विजेनें आपोआप दार उघडतें, व त्याचें पाऊल पायरीवर पडलें कीं विजेची घंटा वाजूं लागते. एखाद्या खुर्चीवर अगर पलंगावर तो बसला कीं लागलींच खालून बाजाचे पेटीचा आवाज सुरू होतो. जेवतांना कोणी मागितलें कीं मिठाचें पाळें एका विजेच्या रेलवेवर पटदिशीं येतें. पाहुणा निजावयाचे खोलींत शिरला कीं बिछाना आपोआप पसरून तयार; फिरून तो उठून गेला व दाराजवळ आला कीं बिछाना गुंडाळतो!

शु० सू०

सर्वांत मोठें कारंजें— स्विट्झरलंडांत जिनिव्हा शहराचे म्युनिसिपालिटीनें बंदराचे दरवाजाजवळ २०० फूट उंचीचें कारंजें केलें आहे. सगळ्या जगांत मोठें कारंजें कोठेंहि नाहीं.

मोंगलाई तऱ्हेचा जुलूम —डे० माजिस्ट्रेट साहेब गादीवर बसण्यास चालले असतां कोणी लोक पायांत जोडे घालून उभे राहिल्याबद्दल आग्र्याकडे डे. माजिस्ट्रेटांनीं दोघे वकील व त्यांचा (वकिलांचा) कारकून यांस एकेक दिवस तुरुंगांत घातलें. पांढऱ्या कातडीला ही कालिमा नव्हे तीट आहे ह्मणावयाची. जुन्या मोंगलाईंत याहून जुलूम होत होते काय?

जवाहिराची चोरी—मिसिस ह्या इर्यागटी नांवाच्या एका प्रसिद्ध नाच्य कुशल स्त्रीनें आपले चाळीस हजार पौंड किंमतीचे जवाहीर सुरक्षित राहण्याकरितां लंडन येथील युनियन ब्यांकेंत ठेवले होते. परंतु ठगानीं बनावट चिठी तयार करून त्या योगानें ब्यांकेस फसवून ते जवाहीर उपटलें.

रानकोटास एक पांजरापोळ स्थापन करण्याकरितां एका महाजनानें २० लाख रुपये दिले आहेत.

मालेगांव तालुक्यांत एका मुसलमानानें दुसऱ्याच्या मनी आर्डरीचे ११ रुपये मेंच तो आहे ह्मणून घेतले त्याजबद्दल त्याजवर खटला होऊन त्या मुसलमानास तीन वर्षें सक्तमजुरीचे कैद व ३० रुपये दंड अशी शिक्षा झाली.

बिन तारेची तार—तारेशिवाय १८०००, मैल खबर पाठवितां यावी अशाबद्दल अमेरिकेंत खटपट चालू आहे.

इं प्र.

येत्या हिंवाळ्यांत पंजाबांत तोफांची एक छटकी लढाई होणार असून त्या करितां ५,००० रुपये खर्च होणार.

हिंदुस्थानांतल्या इंग्रजी पोषाकांत कांहीं फेरफार करण्याचा हिंदुस्थान सरकारचा इरादा असून त्याबद्दल स्टेट सेक्रेटरीची मंजुरी मागितली आहे.

कोणी नवा सिविल कामदार विलायतेहून हिंदुस्थानांत येईल तेव्हां अगर कोणी फार मोठी रजा भोगून परत येईल तेव्हां त्यास स्टेट सेक्रेटरीनें जी कांहीं अडव्हांस रक्कम दिली असेल त्या शिवाय त्याच्या दोन महिन्याच्या पगारा इतकी व १००० रुपये पर्यंत अडव्हान्स रक्कम द्यावी असा नुकताच एक ठराव झाला आहे. त्या रकमेवर सरकार व्याज घेणार काय? नसेल तर आमच्या गरीब शेतकऱ्यांच्या तगाईवर सरकारानें कां व्याज घ्यावें! ते कामदार आमच्या शेतकऱ्यांपेक्षांही गरीब व दरिद्री समजावयाचे काय?

इटाली सरकारच्या रोमन ब्यांकेच्या नोटा ३१ डिसेंबर १८९५ पुढें रद्द समजावयाच्या असा त्या सरकारानें जाहिरनामा लावला आहे.

अ० द०

ताऱ्याच्या दिव्यांच्या व सफेत विद्युत्प्रकाशाच्या साह्यानें आपोआप तसबिरी छापण्याची नवीन युक्ति अमेरिकेंत निघाली आहे. तिच्या योगानें थोड्या अवकाशांत प्रकाशलेखन करण्यास रसायनी द्रव्यांनीं तयार केलेल्या कागदाच्या लांबलचक गुंडाळ्याचा स्पर्श क्रमाक्रमानें एका खोलींत तसबिरीच्या मूळ कांचांशीं होऊन दुसऱ्या खोलींत त्या गुंडाळ्याचें व्यक्तिकरण, स्थितिकरण, स्वच्छ करणें धुणें, व पश्चात्‌ वर डकविणें हीं कामें एका मागून एक अशीं यंत्रांच्या साह्यानें होतात.

टी० बं०

कराची पासून दिल्ली पर्यंत नवीन रेलवे लाईन होणार.

मुंबई इलाख्याचें उत्पन्न गेले वर्षांत १६ कोटी पर्यंत वाढलें.

जर्मन सरकार आपल्या फौजेची मोठी कवायत करणार आहेत त्या साठीं निरनिराळ्या राष्ट्रांशीं रेलवे जोडण्यांत येणार.

भागलपूरमध्यें एका मास्तरानें हरि नांवाच्या ८ वर्षांच्या वयाचे मुलाचा खून दागिन्याच्या अभिलाषानें केल्याच्या शाबिदीवरून फांशी देण्यात आला.

रा. सा. शंकर चिंतामण राजवडे मामलेदार इगतपुरी यांस तेथील मारवाड्याच्या कामांत काढून टाकल्याचें कळतें. या मामलेदारांचा लौकीक चांगला असतां ही धोंड कशी पडली न कळे.


## चांदीचीं भांडीं

श्रीक्षेत्र नासिक येथें तयार झालेली हरएक प्रकारचीं चांदीचीं भांडीं, चांदी उत्तम. चिनई पट १७॥ पेनी. चांदीबद्दल चौकशी करून घ्या. लिहिल्याप्रमाणें नसल्यास डाग परत घेऊं. बाहेर गांवचे देशबांधव यांचे सोयी करितां ही मुद्दाम जाहिरात प्रसिद्ध केली आहे १ तांटें, तांबे, गडवे, पेले, मुंबईपात्रें, फुलपात्रें, वाट्या, पंचपात्रें, ड्रेन. याशिवाय अशा प्रकारचें इतर सांब सामानाचा भाव दर तोळ्यास ०—॥। आणि वर तोळ्यानें विकत मिळेल.—२ पळ्या उकरणी देवपूजेचें सामान वगैरे सर्व प्रकारचें बारिक सामानाचा भाव दर तो. ०=। आणे वरताळ्यानें देऊं—३ तबकें चौफुलें अत्तर दाण्या, गुलाबदाण्या, करंडे, डब्या वगैरे नक्षीचे सामानाचा भाव दर तोळ्यास ०=॥ आणे प्रमाणें वरताळ्यानें देण्यांत येईल—शिवाय चांदीचे व सोन्याचे दागीने ठुश्या वजरटिका सुद्धां घाटघडाई उत्तम पैकीं भाव वगैरे पत्रद्वारें कळेल—नासिकचे भांड्याचा घाट आपल्या देशांत उत्कृष्ट आहे हें सर्वांस माहितच आहे. त्यांत आह्मी उत्तम कारागीराकडून हा सर्व माल तयार करून आमचे दुकानीं ठेविला आहे—शिवाय आमच्याशीं अडत ठेवणें असेल अगर व्यापाऱ्यास हर वर्षीं विक्री करितां माल पाहिजे असल्यास त्याजबद्दलचा निराळा ठराव केला जाईल

विशेष सूचना—चांदीचा भाव कमजास्त झाल्यास वरताळ्याचा भाव कमजास्त केला जाईल.

शिवाय घड्याळें रेलवे रेग्युलेटर असून कांटे फिरविण्यास ठेस चावी देण्यास मोगरा घड्याळावर ट्रेडमार्क (नासिक सुयस मेड मालकाचें नांव) किंमत १२ रुपये ग्यारंटी ५ वर्षांची सोबत कांच कमान पेटी व ग्यारंटी मिळेल

वर लिहिलेलें सामान व्ही. पी. नेंही पाठविलें जाईल.

पत्ता—उदेचंद मुळचंद छाजेड फुल गल्ली पुलावर नासिक सिटी.

## उत्तम सोय

आह्मी हिंदुस्थानांतील सर्व लोकांकरितां [ व्यापारी अथवा खासगत ] सोलापूर येथें सुती व रेशमी लुगडीं, खणाळी, संत्र्ज्या (कच्चे व पक्के रंगाच्या) खाद्या, घोंगड्या, नाना तऱ्हेच्या, ठाना क्लाथ व येथील गिरणींत तयार होणारें सर्व प्रकारचें कापड [illegible] कर्नाटक व मद्रास इलाख्यांतील [illegible] रुमाल धोतरजोडे सर्व व रेशमी [illegible] रोख पैशानें अगर व्ही. पी. रीतीनें माफक कमिशन घेऊन ताबडतोब रवाना करूं.

आमचे तंबाखूचे कारखान्यांत मुंबई, पुणें व कल्याण येथील नमुन्याप्रमाणें उंची मध्यम व मिश्र विड्या तयार होत असतात भाव किरकोळ व ठोक शोस दोन आहेत. समक्ष अगर पोस्टपेड पत्रद्वारा चौकशी आह्मापाशीं करावी.

केशवराव साटये
सदर बाजार, सोलापूर


☞ हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

... ,, ...
... अंकास .... .... .... ०४

Six monthly ... ... ... 3 ,, 8 as.
Single copy ... ... ... ... ... 4 as.

नोटिसी बद्दल.
१० ओळींचे आंत रु० १
दर ओळीस .... ०।०६
दुसरे खेपेस .... .... ०।

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs.
Per line over 10 ... 4 as.
Repetition Per line 3 as.

VOL XXIX — AKOLA MONDAY 14 OCTOBER 1895 — NO 40

वर्ष२९ — आकोला सोमवार तारीख १४ माहे आक्टोबर सन १८९५ इ० — अंक ४०

## जाहिरात

तारीख २६ आगष्ट सन १८९५ च्या वऱ्हाडसमाचार वर्तमानपत्रांतील १६व्या कालमामध्यें ८व्या ओळींत "मौजे सांगवी खुर्द येथील यांनीं आपलें घर" असें आहे तेथें "मौजे खांबेरें प्रगणें व तालुके आकोलें येथील यांनीं आपलें घर" असें वाचावें. तारीख २ सप्तेंबरच्या अंकांत दुसऱ्यानें प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींत हीच दुरुस्ती केली जावी. ता. ८।१०।९५.

रामचंद्र मार्तंड गुप्ते वकील.
तर्फे कन्हयालाल वल्लद रामचंद्र वादी.

वऱ्हाडसमाचार

मिती आश्विन वद्य ११ शके १८१७

इंडियाचें राज्य इंडियन लोकांसाठींच आह्मी करितों अशी इंग्लिश लोक नेहमीं प्रौढी मारीत असतात आणि थोडे दिवसापूर्वी लंडन टाइम्सला एका गृहस्थानें लिहिलें होतें कीं लिबरल प्रधानमंडळ होतें तेव्हां इंडियन लोकांच्या कल्याणदृष्टीनें राज्यकारभार चालविण्याचा पोकळ आव घातला जात असे परंतु हल्लीं कान्सरव्हेटिव पक्षाचें प्रधानमंडळ बनलें आहे तें जोरदार असून त्यांची सर्वथैव दृष्टी या देशाच्या वास्तविक कल्याणाकडे आहे. हें विधान उदार शीलाचें आहे पण तें कृतीवरून लटकें ठरत असल्या विषयीं वारंवार आपणास अनुभव येत आहे. वरपंगी बोलणें एक आणि करणी त्याच्या उलट ह्मणजे तें चांगुलपणाचें लक्षण नसून राष्ट्राच्या लौकिकाला कालिमा आणणारें आहे. उदाहरणार्थ, चित्रळची मोहिम घ्या. प्रथम डाक्टर राबर्टसन यांच्या बचावासाठीं ह्मणून चित्रळवर स्वारी करण्याचा बेत ठरला. परंतु पुढें पाऊल टाकतांच चित्रळचा पहाडी प्रदेश काबीज केला. सर वेडरबर्न यांनीं चित्रळप्रांत काबीज करूं नये अशा विषयीं प्रश्न काढला होता पण पार्लमेंटच्या विवादाच्या नियमनाचा शह देऊन मि. बाल्फर यांनीं तो प्रश्न मालूस सारला. अगोदर चित्रळच्या स्वारीचें प्रयोजन नव्हतें. लढाईचा खर्च मागविण्याची इंडियन खजिन्यातून सोय होत नव्हती असें असूनही लढाई सुरूं केली. परंतु पुढें इंग्लिशाची दहशत बसल्या नंतर रस्ते करण्याची, फौजफांटा कायम ठेवण्याची, चित्रळची राज्यक्रांती करण्याची, व गादीवर अल्पवयी राजपुरुष बसवून राज्यसूत्रें पोलिटिकल एजंट मार्फत आपल्या हातीं घेण्याची काडीमात्र अवश्यकता नव्हती. पण आमच्या राज्यकर्त्यांची राज्यतृष्णा बलवत्तर आहे, लष्करी अधिकाऱ्यास लढाई शिवाय चैन पडत नाहीं, आणि इंडियाचा खजिना अवाढव्य खर्चाखालीं फस्त झाला तरी काळजी वाहण्याची जरूर नाहीं. इंग्लिश सरकारचा पूर्वी पासूनच चित्रळवर डोळा होता आणि प्रथम काश्मिर पासून गिलजिट पर्यंत आपलें राज्य स्थापिलें व नंतर गिलजिट पासुन चित्रळपर्यंत मजल पोंचविली आणि आतां हळू हळू राज्यविस्तार हरतऱ्हेनें चालविला आहे. इंडियाच्या खजिन्याची लूट मांडून ब्रिटिश राज्यप्रसार चालला आहे याला इंडियाचें कल्याण करण्याचें ब्रीद कोणी ह्मणतें! पार्लमेंटांत प्रधानमंडळाच्या विचाराविरुद्ध पण इंडियाच्या वर्तीनें कांहीं समासद मंडळी प्रश्न काढतात त्यावेळीं त्याचें कांहीं चालूं नये, ह्मणून देखील हर प्रयत्न करण्यास लार्ड सालिसबरी पासून सर्व जण झटत असतात. लार्ड रोझबरीच्या वेळीं सर फौलर यांनीं चित्रळ प्रांत सोडण्या विषयीं निराळा ठराव केला होता पण तो पक्केपणीं हुकुमा प्रमाणें कळविला नव्हता ह्मणून तेवढ्या सबबीवर लार्ड लान्सडौन, कर्झन प्रभृति हितशत्रु मुत्सद्यांच्या विचारावर पूर्वीचा सर्व संकल्प उलटला !

इंग्लिशाच्या राज्यव्यवस्थेचें खरें स्वरूप या चित्रळच्या हकीकती वरून स्पष्ट कळतें. चित्रळची स्वारी इंडियाच्या हिता साठीं होती किंवा ब्रिटिश राज्यवैभवासाठीं होती याचें उत्तर वाचकच परभारें देऊं शकतील.

हिंदुस्थानच्या जमाखर्चा संबंधानें एक विस्तृत व मुद्देसूत लेख मि. ए. जे. वुइल्सन नावाच्या पत्रकर्त्यांनीं प्रसिद्ध केला आहे. तें लिहितात कीं रयतेवर करांचा बोजा जबरदस्त बसविला असून जो पुष्कळ कोटी रुपये वसूल येतो त्याचा खर्च ब्रिटिश सरकार उधळपट्टीनें व बेतालपणानें करितें. इंडियांतील रेल्वे देखील हिंदुस्थानच्या नफ्या करितां नाहींत. त्या रेल्वे पासून फायदे होतात त्या पेक्षां तोटे बहुत होतात. भांडवल विलायतेंत उभारलें असल्यामुळें व्यापाराचा सर्व फायदा परकी लोकांचा आहे. पौंडाच्या नाण्यांत भांडवल असल्यामुळें हुंडणावळीमुळें तोटा होतो आणि रेल्वे चालविण्यासाठीं भांडवलावर कबूल केलेलें व्याज इंडियाच्या तिजोरीतून भरावें लागतें. सर जान शोअर सारखे स्पष्टवक्ते मुत्सद्दी पूर्वीच लिहून चुकले आहेत कीं फार दूरवरचें परकी राष्ट्र सत्ताधारी आहे एवढ्याच कारणामुळें नफ्या पेक्षां नुकसान बहुत प्रकारें होत असून तें टाळण्या सारखें नाहीं. परकी राष्ट्राचा अंमल आहे ह्मणजे तेथें सापत्नपणाचा मामला सुरूं झाला. सहस्रावधि मैलावरून आमच्या देशांत राज्य करणारे लोक आपल्या स्वार्थाला सोडून नेटिवांच्या कल्याणाकडे नजर देतील ही गोष्ट मनुष्यस्वभावाच्या आपमतलबीपणाला साजतच नाहीं. परकी लोकाचें राज्य असलें ह्मणजे कांहीं विघ्नसमुच्चय व अनर्थपरंपरा हीं परकीयाच्या प्रभुत्वांत अंतर्गत आहेत. जे तोटे परकी अमलामुळेंच उद्भूत आहेत त्या संबधानें आमचें कांहीं ह्मणणें नाहीं परंतु जे तोटे बुद्धिपुरस्सर राज्यकर्त्यांनीं स्वकीय मतलबासाठीं केले त्यांनीं पूर्वीं सांगितलेले तोटे हजारो पटीनें वाढविले आहेत त्यांचे मात्र निर्मूलन करणें न्यायबुद्धि व उदार राज्यकर्त्यांचें कर्तव्य आहे. नाहीं तर राज्यतृष्णेच्या पायीं इंडिया देश बुडत आहे. हल्लीं जी प्रचंड लुटालुट चालू आहे ती मोडून तेथें व्यवस्थितपणा व बेताचा खर्चिकपणा आरंभला तर सरकारचें ब्रिटिश राज्य चिरकाळ व मजबूत होईल; इंडियन लोकाच्या हिताचा प्रश्न निवाला ह्मणजे राज्यकर्त्यांनीं आपल्या स्वार्थाचें घोडें पुढें ढकलता कामा नये; इंग्लिश लोक लष्करांत मुख्य, दिवाणी फौजदारींत मुख्य, मुलकी राज्यकारभारांत मुख्य, व सर्व प्रकारें मुख्य दर्जाच्या, भारी पगाराच्या, मोठ्या अधिकाराच्या जागा सर्व इंग्लिशांनीं व्यापून सोडल्या आहेत आणि नेटिवांचा अणुरेणू एवढा देखील शिरकाव होऊं देत नाहींत; विलायतेंतील इंडिया आफिसनें सर्व सूत्रें इंग्लडच्या फायद्या साठीं हातीं घेतलीं असून सर्वत्र आपल्या जातबंधूचा फलफलाट करून सोडला आहे; काटकसर मुख्य मुख्य प्रकरणीं न करिता हुंडणावळीची मनोती ह्मणून पगार वाढविण्याच्या युक्त्या देखील बहुत लढविल्या आहेत; इत्यादि गोष्टीच्या पायावर रचलेली राज्यपद्धति कितपत टिकाव धरील या विषयीं मोठी शंका आहे इतकेंच नाहीं तर त्याच राज्यपद्धतीमध्यें राज्याच्या विलयाची कारणें आपलीं कार्यें क्रमशः उत्पन्न करित आहेत आणि तीं कार्यमाला भूकंपाप्रमाणें आपलें रूप प्रगट करण्यापूर्वीच निराळी चांगली राज्यपद्धति सुरूं झाली तर ब्रिटिश राज्य सतत चालेल, इंडिया देश वैभवशाली होईल आणि इंग्लंडचा महिमा सर्व पृथ्वीभर विख्यात होईल. आपण बहुत राष्ट्रांचे इतिहास वाचले आहेत; त्यांतून राष्ट्रें कालचक्राखालीं वरील प्रकारच्या कारणसमुच्चयामुळें चुरडून गेल्याची साक्ष अथेन्स, रोम वगैरे जुनाट राष्ट्रें देत आहेत. असा प्रकार इंडिया संबंधानें होऊं न ये आणि इंडियाच्या इतिहासानें उलट प्रकारची साक्ष पटावी अशी सर्वजणांची ईश्वरा जवळ प्रार्थना आहे.

राम मोहनराय हा एक मोठा आलीकडचा धर्मात्मा होऊन गेला. त्यांचा प्रयत्न सर्व धर्मांचें सार घेऊन निराळाच धर्म चालूं करावयाचा होता. त्यांची पुण्यतिथी गेल्या २७ वे तारखेस मुंबईस झाली त्या वेळीं मुंबईचे प्रसिद्ध बारिस्टर चंदावरकर यांनीं राम मोहनरायच्या वर्तनाचा कित्ता वळविण्या साठीं पुढें ठेवून उपदेश केला. त्यांत ते ह्मणाले कीं, सर्व गोष्टींचें मूळ बीज खरी कळकळ व मनाचा दृढभाव हीं आहेत. त्यांच्या वांचून सर्व व्यवहार शून्य आहेत. खरी सुधारणा याच दोन तत्वावर अवलंबून आहे आणि त्यांचा अभाव सध्यां फार आढळतो. जगामध्यें खरोखर जे उदयास आले त्यांचा उत्कर्ष वरील दोन गोष्टी मुळेंच झाला. दुसरी गोष्ट त्यांनीं निराळ्या धर्मांची तुलना करून सत्यशोधन करण्या संबधानें सांगितली. महंमदी धर्म असो, किंवा ख्रिस्ती धर्म असो, सर्व धर्मांचें सार समजून घेऊन मत्सर एकीकडे सारून आपला अध्यात्मिक मार्ग सुधारावा. पोकळ वाद करण्या पेक्षां किंवा गोड गोड उपदेश करण्या पेक्षां आपल्या स्वकीय सद्वर्तनाचा धडा लोकांच्या नजरेसमोर मांडावा ह्मणजे निराळा बोध करावा लागत नाहीं. शेवटीं त्यांनीं सांगितलें कीं अलिकडे धार्मिकपणा व सत्वस्थपणा दाखविण्याचा दंभ फार माजला आहे आणि खऱ्या धार्मिकपणाला किंवा सत्वस्थपणाला कोणी मान देत नाहींत. हा नीतीचा पाया अगदीं कच्चा व ढिसूळ आहे आणि अशा पायावर चढलेली राष्ट्रनीतीची इमारत केव्हां ढासळेल याचा नेम नाहीं. राष्ट्र नीतिभ्रष्ट झालें ह्मणजे तें नामशेष किंवा इतिहासविषय झालें असें मानण्यास कांहीं हरकत नाहीं. सारांश, इंडियाची उन्नति होण्यास वर तीन गोष्टींची अवश्यकता दर्शविली आहे ती सर्वांनीं ध्यानांत ठेवण्या सारखी आहे.

व्हाइसराय लार्ड एल्जिन यांची स्वारी नोवेंबरच्या १३ व्या तारखेच्या सुमारास हैदराबादेस निजाम सरकारच्या मुलाखती साठीं येणार आहे हें आतां खास ठरलें आहे. व्हाइसराय साहेबांच्या आगमना निमित्त हैदराबादेस टॉलेंनग तयारी चालूं आहे. लार्ड रिपन साहेब प्रथम हैदराबादेस निजाम सरकारास गादीवर बसविण्यासाठीं गेले होते त्या वेळीं मोठा अप्रतिम समारंभ झाला होता असें वाचण्यांत आहे. आणि त्या नंतर दोन तीन समारंभ असेच मोठे टॉलेंनग झाले होते. त्या मानानें पुढील महिन्यात तीन चार लाख रुपये खर्च करून लार्ड एल्जिन यांस पाहुणचार दिला जाईल हें पूर्व वृत्तान्ता वरून स्पष्ट आहे. पण विचार इतकाच कीं असा अवाढव्य खर्च करणें शहाणपणाचें नसून रयतेचा नागवणूक आहे. अगोदर, हैदराबाद संस्थानच्या तिजोरीची सुस्थिति नाहीं आणि तशांत अशी उधळपट्टी झाली ह्मणजे ती फार

वाईट गोष्ट होय. पण मौन व्रताचें अवलंबन करून जीवघारणा करणाऱ्या रयतेची निजाम सरकारा पर्यंत कोण दाद पोंचवील बरें !

"विधवाविवाह प्रतिबंध निवारक मंडळी" चे चिटणीस रा. रा. धोंडो केशव कर्वे हे हल्लीं वऱ्हाडांत आले आहेत. गेल्या गुरुवारीं येथील लायब्ररींत त्यांचें व्याख्यान झालें. सदर्हू 'मंडळीचे उद्देश व विधवागृह स्थापन करण्याची आवश्यकता' हा भाषणाचा विषय होता. रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी यांनीं या गृहस्थांचा सभेस आलेल्या श्रोतृसमाजाशीं परिचय करून देतांना सांगितलें कीं राजश्री कर्वे हे फर्ग्युसन कालेजांत प्रोफेसर आहेत. पुण्यास बोलके सुधारक व कर्ते सुधारक असे दोन वर्ग आहेत त्या पैकीं हे कर्त्या सुधारकांतले आहेत. यांनीं स्वतां विधवेशी विवाह करून आपलीं सुधारणाविषक मतें प्रत्यक्ष उदाहरणानें कळविलीं आहेत.

येणें प्रमाणें ओळख करून दिल्या नंतर राजश्री कर्वे यांनीं व्याख्यानास आरंभ केला. स्वतांचा प्रयत्न फार अल्प आहे तो मुंगी व मधमाशी प्रमाणें आहे असें सांगून ते बोलले कीं गेल्या पंचवीस वर्षांपूर्वींच्या स्थितींत आणि हल्लींच्या स्थितींत फार फरक झाला आहे. पूर्वीं पुनर्विवाहित मनुष्या संबंधानें किंवा पुनर्विवाहाच्या संस्था संबंधानें लोकांची तिरस्कारबुद्धि विशेष होती. पण हल्लीं ती उत्तरोत्तर कमी होत चालली आहे. हा फरक स्पष्टपणें कळवितांना राजश्री कर्वे यांनीं पुनर्विवाहा संबधानें क्रमशः कांहीं गोष्टी महत्वाच्या सांगितल्या.

पहिली गोष्ट अशी कीं विधवेशी विवाह करणें बरें असो किंवा वाईट असो, माझ्या मतें तें बरें आहे. पण अंततः विधवाविवाह सुखकर होईल किंवा नाहीं हेंही माझ्यानें सांगवत नाहीं. विधवाविवाह एकंदर पृथ्वीमध्यें सरासरीनें एका हजारा पैकीं ९९९ लोकांस संमत आहे. नीति दृष्ट्या कांहीं तत्वें सार्वत्रिक व सार्वकालिक सारखींच असत त; पण दुसरीं कांहीं तत्वें देशकालवर्तमाना प्रमाणें बदलत असतात तद्वत विधवाविवाहाचें तत्व देशकालमाना प्रमाणें बदलणारें आहे.

दुसरें, हजारापैकीं ९९९ मनुष्यें चुकत असतील असेंही ग्रहीत धरलें तथापि पुनर्विवाहिता संबधानें तिरस्कारबुद्धि नको. थोडा वेळ मनांतला पक्षाभिमान कमी केला आणि निःपक्षपातानें विचार केला तर असें आढळेल कीं पुनर्विवाहाला जे प्रवृत्त होतात त्यांचे अंतस्थ हेतु शुद्ध असतात. आपल्या समाजाचें कल्याण व्हावें हा हेतु मुख्य असतो आणि हा अत्यंत शुद्ध आहे. हेतु शुद्ध असला आणि कार्य निराळेंच घडलें तथापि त्या कार्या बद्दल त्या मनुष्या विषयीं आपल्या मनांत तिरस्कार वाटणार नाहीं. टिंडाल नावाचे प्रसिद्ध शास्त्रज्ञ अलिकडे मरण पावले. औषधाच्या ऐवजीं त्यांच्या धर्मपत्नीनें चुकून विष दिलें आणि त्या मुळें प्रो. टिंडाल यांचा प्राण गेला तथापि त्या चुकी बद्दल ती साध्वी पतिघ्नी आहे असें कोणास वाटेल काय?

तिसरें, विधवाविवाहास प्रवृत्त असणाऱ्यांचा फायदा तरी कितीसा असतो! मनुष्य कोणताही व्यवहार स्वार्था साठींच करीत असतो हें खरें पण त्याला या गोष्टींत त्रास बहुत होतो. एका क्षणांत आईबाप, बहिण भाऊ, व आप्तसोयरे हे सर्व परक्या सारखे होतात. त्यांच्या तिरस्काराला हा धीट मनुष्य पात्र होतो. कोणी उच्च पदवीचा देखील असला किंबहुना उत्तमोत्तम असला तरी विधवाविवाहानें तो उद्यां अधमोऽधम बनतो. आपल्या स्वकीयांच्या प्रेमाला मुकतो. पण निःपक्षपातबुद्धीनें पाहिलें तर विधवाविवाहांत स्वार्थांचा फायदा व समाजाचें कल्याण असून एका अडचणींतल्या माणसाची सोडवणूक होते.

चवथें, जगांतील सर्व व्यवहार चढाओढीनें चालले आहेत. प्राणिसृष्टीमध्यें ज्याच्या अंगीं जीवनसामर्थ्य जास्त असेल तो इतरास मागें टाकून स्वतां पुढें जातो. प्राणिसृष्टीप्रमाणेंच विचारसृष्टीची गोष्ट आहे. नव्या कल्पना व जुन्या कल्पना यांचें युद्ध चालूं आहे. चढाओढीमध्यें ज्यांचा टिकाव लागेल त्या खऱ्या. हें युद्ध केवळ पशूप्रमाणें शारीरबलाचें नसून विचाराचें व मानसिक आहे. धर्मयुद्ध झालें पाहिजे. मिथ्या भास, गैरसमज इत्यादिकामुळें मोठी हानि होत असेल ती होऊं देतां कामा नये. आपल्या मताच्या पुष्टीकरणार्थ आपण अनेक युक्त्या लढवितो त्यावेळीं दुसऱ्याच्या मताचा वृथा त्याग करूं नये. देशकालवर्तमाना प्रमाणें जें तत्व चांगलें ठरेल तेंच अखेरीला टिकेल. उभयपक्षांनीं परस्पराविषयीं वाईट बुद्धि धरूं नये. विधवाविवाहाचा पक्ष चांगला असेल तर तोच परिणामीं विजयी पावेल.

पांचवें, लौकिकी धर्माच्या दृष्टीनें पाहिलें तरी पुनर्विवाह धर्माला अनुकूल आहे. निदान तो धर्माला प्रतिकूल तरी नाहीं. पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर भिकू शास्त्री इत्यादि विद्वानांनीं अशा विवाहाला धर्माच्या आज्ञा दाखविल्या आहेत. प्रत्यक्ष श्रीशंकराचार्यांनीं आपल्या समोर या विषयावर वादविवाद करविला. हें मद्यमांसा प्रमाणें निषिद्ध असता तर शंकराचार्य निदान त्यांत पडले नसते. दहा विद्वान पंच नेमून वादविवाद चालला होता. या दहापैकीं चौघाजणांनीं पुनर्विवाहाला अनुकूल अभिप्राय दिला हीच गोष्ट या विषयाचें महत्व दाखवितें. विधवा विवाह बरा आहे, कालदेश वर्तमानाला अनुसरून आहे आणि प्रतिस्पर्धी देखील याला अगदीं प्रतिकूल नाहींत हें विसरतां कामा नये.

नंतर व्याख्याते हल्लीं विधवाविवाहा संबधानें चाललेल्या उद्योगाकडे वळले. आरंभीं पुनर्विवाहाच्या चळवळीचा संक्षिप्त इतिहास सांगितला. ते म्हणाले कीं सन १८६९पासून विशेष जारीनें ही खटपट सुरू झाली. कैलासवासी विष्णु शास्त्री पंडित जीवंत होते तोंपर्यंत ही खटपट नेटानें चालूं होती. वादविवादांत लोकाचे ग्रह अनुकूल होत चालले. विधवाविवाहाला शास्त्रीबोवांची अनुकूलता होती पण ती विधवाविवाहापलिकडे जातीच्या निर्बंधात हात घालण्याच्या स्वरूपाची नव्हती. शास्त्रीबोवा नंतर धुरिण नाहींसा झाला. आर्धीच लोकांस हा विषय अप्रिय होता आणि विधवाविवाहाचें प्रोत्साहन करणाऱ्यांचें वर्तन बेताल झालें त्यामुळें हा विषय फारच अप्रिय झाला. एका जातीच्या विधवेनें परजातीच्या मनुष्याशी लग्न लावलें मुहूर्त वगैरे पाहण्याची जरूर ठेविली नाहीं, लग्न विधी देखील बदलले, आणि विशेष जबाबदार नसणाऱ्या मनुष्यांच्या हातीं ही नाजूक सुधारणा गेली त्यामुळें विधवाविवाहाच्या प्रश्ना संबंधानें प्रतिक्रियेच्या काळाला आरंभ झाला. १८६९ पासून सुशिक्षित मंडळी नव्या नव्या कल्पनेला अनुकूळ होती तथापि व्यवहारांतील अडचणीमुळें या प्रतिक्रियेला सुरुवात झाली. सुधारणेचा अतिरेक झाला तेव्हां या प्रतिक्रियेमुळें खऱ्या व आवश्यक सुधारणा देखील मागें पडल्या आणि त्यामागें अशाच पडत जाण्याची भिती अद्याप नाहींशी झाली नाहीं. पाहिजे त्या परजातीशीं पुनर्विवाहाचा व्यवहार करणाऱ्यास या प्रतिक्रियेनें अगदीं मागें टाकलें.

तथापि १८६९ सालीं सुरू झालेल्या सुधारणे संबधानें पांच सात वर्षें मोठी उत्कंठा व कळकळ होती. गृहस्थितींतल्या नाना अडचणीमुळें ही सुधारणा मागें पडली. पुनर्विवाहाच्या पक्षांतील लोकांचें वजन नव्हतें, कोणी तरी चिटणीस म्हणून काम करी, समाजांतल्या लोकांस बंधन कांहींच नव्हतें, आणि कांहीं तरी काम होत असे.

३ वधु भूषण पाक– सर्व प्रकारचे प्रदरावर.
४ साखंमिश्री पाक, मुसळी पाक, बदाम पांक मुय कोव्हाळे पाक– उत्तम पौष्टीक.
५ बालंत रोग व क्षय रोगावरील— ४२ दिवसांत गुण येतो.
६ आम्लपित्त पोट शुळावरील पाक–८ दिवसांत गुण.
७ मधुमेहावरील पाक–४० दिवसांत गुण.

अन्य औषधें

८ आकडी वरील गोळ्या– डबीस किं रु. २
९ डब्या वरील गोळ्या– डबीस किं. रु.१॥
१० दम्या वरील गोळ्या- डबीस किं. २॰४
११ दम्या वरील पुड्या–दर रुपयास २०
१२ अद्भुत चमत्कारिक वीर्यस्तंभक चूर्ण– तोळ्यास ॰३ आणे.
१३ सर्व रोगा वरील गोळ्या-डबीस किं. रु.१
१४ उपदोष शामक गोळ्या– डबीस किं. रु० २॰४
१५ वात विध्वंसक तेल–सर्व वायुवर पावशेराचे कुपीस किं. २॰१०
१६ उपदोषशामक मलम–डबीस किं. रु. १
१७ प्रमेहावरील गोळ्या– ८ गोळ्यास किं. रु० १
१८ शतपुटी ओवा— संधीवात, आमवात वगैरेवर किं. दर तोळ्यास ॰६ आणे.
१९ शतौषधी मलम– रक्तपीती, व्रण वगैरेवर दर तोळ्यास किं० ॰६ आणे.
२० बाळगुटीच्या गोळ्या– मुलाची प्रकृती चांगली राहून आगडी डबा-वगैरे होत नाहीं. किं. दर तोळ्यास ॰१२ आणे.
२१ रक्त पीती वरिल औषध— तोळ्यास किं० रु० १॰८
२२ नेत्र रोगावरील काजळ– डबीस किं० रु० ॰१२ आणे.
२३ प्रवाळ भस्म–पित्त विकारावर किं. दर तोळ्यास रु. ॰१२ आणें.
२४ खोकल्या वरील गोळ्या– डबीस किं. ॰१२ आणे.
२५ पाचक गोळ्या–अन्न पचन होऊन क्षुधा वाढते ३० गोळ्याचे डबीस किं० रु. १
२६ कुडे पाक– संग्रहणी, पांडु यांजवर ३० गोळ्याचे डबीस रुपया १.
२७ पटकी वरील फळें–दर रुपयास २०
२८ वाकेरीचें भातें–दर रुपयास तोळे १०
२९ तापाच्या गोळ्या–सर्व ज्वरावर डबीस किं. ॰१२ आणे.
३० रक्त शुद्धीच्या गोळ्या– दर रुपयास डब्या २
३१ स्तंभक, कामोत्तेजक सुवर्ण कस्तुरीयुक्त संजीवनी गुटीका–डबीस किं० रु० १
३२ वनौषधी गुटीका– भ्रमण पीतावर व मस्तकांतील कडकीवर किं. रु. १
३३ व्रणावर औषध– किं. रु. ६
३४ भगेंद्रवळासुर याजवरील औषध. किंमत रुपये ७
३५ ल्होहा गुल्म या वरील औषध किं. रु. ६
३६ बहुमुत्रा वरील औषध–किं० रु० १०
३७ कामले वरील औषध–किं० रु. ५
३८ धातुक्षय, उरक्षत, पांडु याजवरील औषध किं. रु. १५
३९ गंडमाळे वरील औषध–किं. रु. ७
४० श्वेत कुष्टावरील औषध किं. रु. ३०
४१ कर्ण रोगनाशक तेल–दर कुपीस रु.१
४२ दातांचे मंजन–सर्व मुख रोगावर किं० दर तोळ्यास आणे ॰३
४३ रक्त मुळ व्याधी वरील मलम व मुळी दर तोळ्यास किं. ॰१२ आणे.
४४ वृश्चिक दोषा वरील औषध– तोळ्यास किं० ॰१२ आणे.

वरील औषधें व अन्य सर्व रोगा वरील औषधें आणि वनौषधी प्रकाश, गरमीचें पुस्तक, सुषेण चिकीच्छा; गरीबाचा वैद्य. बाल वैद्य, गुराचा वैद्य हीं पुस्तकें सहीतील पत्यावर आह्माकडे मिळतील.

सावगीची सुचना

आमचे कारखान्यांत काम केल्याचें लिहून कोणी ही आमचे औषधांची जाहिरात दिली तथापि त्यांशी आमचा कोणच्या ही प्रकारचा संबंध नाहीं. ह्मणुन ती आमची असें समजून घेऊन फसूं नये. व खरी माहिती आह्मी कोणासही दिली नाहीं. आमचा खरा माल आह्माकडेसच सहीतील पत्यावर मिळेल.

प्रकृती मान कळविलें असतां निदान करून योग्य औषधाची योजना करणेंत येईल.

वासुदेव चिंतामण बापट वकील
मु० नारिंग्रें.
ता० देवगड
जि० रत्नागिरी

## जाहिर खबर

बाहेर गांवच्या सर्व व्यापारी लोकांस कळविण्यांत येतें कीं; आमची पेढी मुंबईंत फार दिवसांपासून चालूं असुन आह्मी पुष्कळ फायद्यानें माल खरेदी करून पाठवित असतों. ज्या व्यापारी लोकांस भुसारी, कापड, फरनीचरचें जातींचें सामान, लांकूड, लोखंड, किराणा, हांडवर ( चुका, स्क्रू वगैरे ) स्टेशनरी व ग्यासलेट वगैरे कोणत्याही जातीचा माल मागणें झाल्यास आह्मी पुष्कळ फायद्यानें आणि कसोशीनें व त्वरित पाठवूं. एक वेळ माल मागविल्यावर खात्री होईल. आमच्या कामिशनचा भावही फारच कमी ह्मणजे शेंकडा एक टक्या प्रमाणें आहे. माल मागविणें तो व्ह्याल्यू पेबलनें अगर आगाऊ रुपये पाठवुन मागवावा. पण व्ह्याल्यू पेबलनें माल मागविणारांनीं शेंकडा २५ रुपये प्रमाणें रक्कम आगाऊ पाठविली पाहिजे. ज्या लोकांस माल मागविणें असेल त्यांनीं खालील पत्यावर आपलें नांव, गांव, स्टेशन वगैरे स्पष्ट खुलासेवार लिहून पत्रव्यवहार करावा. पत्रें पोस्टपड पाठवावीं व उत्तराकरितां टिकीट पाठवावें.

**तईयब अली मुलावली भाई.**

मच्छी बाजार, अबदुल राहिमान स्ट्रीट. मुंबई.

## चांदीचीं भांडीं

श्रीक्षेत्र नासिक येथें तयार झालेली हरएक प्रकारचीं चांदीचीं भांडीं, चांदी उत्तम. चनिई पाट १७॥ पेनी. चांदीबदल चौकशी करून घ्या. लिहिल्याप्रमाणें नसल्यास डाग परत घेऊं. बाहेर गांवचे देशबांधव यांचे सोयी करितां ही मुद्दाम जाहिरात प्रसिद्ध केली आहे. १ तांटें, तांबे, गडंव, पेले, मुंबईपात्रें, फुलपात्रें, वाट्या, पंचपात्रें, ट्रेन. याशिवाय अशा प्रकारचें इतर सांव सामानाचा भाव दर तोळ्यास ॰–॥। आणे वर तोळ्यानें विकत मिळेल.—२ पळ्या उपकरणी देवपुजेचें सामान वगैरे सर्व प्रकारचें बारिक सामानाचा भाव दर तो. ॰=। आणे वरताळ्यानें देऊं—३ तबकें चौफुलें अत्तरदाण्या, गुलाबदाण्या, करंडे, डब्या वगैरे नक्षीचे सामानाचा भाव दर तोळ्यास ॰=॥ आणे प्रमाणें वरताळ्यानें देण्यांत येईल—शिवाय चांदीचे व सोन्याचे दागीने ठुश्या वजरटिका सुद्धां घाटघडाई उत्तम पैकीं भाव वगैरे पत्रद्वारें कळेल—नासिकचे भांड्याचा घाट आपल्या देशांत उत्कृष्ट आहे हें सर्वांस माहीतच आहे. त्यांत आह्मी उत्तम कारागीराकडून हा सर्व माल तयार करून आमचे दुकानीं ठेविला आहे—शिवाय आमच्याशीं अडत ठेवणें असेल अगर व्यापाऱ्यास हर वेळीं विक्री करितां माल पाहिजे असल्यास त्याजबद्दलचा निराळा ठराव केला जाईल.

विशेष सूचना—चांदीचा भाव कमजास्त झाल्यास वरताळ्याचा भाव कमजास्त केला जाईल.

शिवाय घड्याळें रेल्वे रेग्युलेटर असून कांटे फिरविण्यास ठेस चावी देण्यास मोगरा घड्याळावर ट्रेडमार्क ( नासिक सुयसे मेड मालकाचें नांव ) किंमत १२ रुपये ग्यारंटी ५ वर्षांची सोबत कांच कमान पेटी व ग्यारंटी मिळेल

वर लिहिलेलें सामान व्ही. पी. नेंही पाठविलें जाईल.

पत्ता—उदेचंद मुळचंद छाजेड फुल गल्ली पुलावर नासिक सिटी.

## जाहिरात

स्कुल ड्रिल किं० ॰१० आतांशद्ध



मराठी व इंग्रजी उच्चारासह मुंबईत पेतड्डार याज कडे अगर आह्मां कडे.

गोविंद भा.
ओक
सदर बाजार, सोलापूर

जूरीची पद्धत हल्लीं जी अमलांत आहे ताच चांगली आहे व ती चालूं नसलेल्या प्रांतांतही सुरू करा अशाबद्दल पुण्याची सार्वजनिक सभा सरकारास लवकरच एक अर्ज करणार आहे.

पंढरपूरचा अपकारी इन्स्पेक्टर व त्याचा मुलगा हे तिकडील अतिवृष्टीच्या महपुरांत सांपडून वाहून गेले व मेले असें समजतें.

पुण्यास पुण्याचे कांहीं बडे नेटिवलोक एक ट्रामवेचा कारखाना सुरू करण्याच्या बेतांत असून त्या करतां म्युनिसिपालिटीस अर्ज केला आहे असें सांगतात.

टर्कींची राजधानी कुस्तन्तुनिया येथें त्या आर्मेनियन लोकांचा एक मोठा वाडा आहे. त्या वाड्याच्या पुढें पुष्कळ आर्मेनियन लोकांचा मोठा जमाव झाला व गडबड सुरू झाली. पोलिसानें यत्न करून तो [illegible] लोक धापाळ; होऊन कि[illegible] पुष्कळांस कैदही केलें.

आर्मेनियन लोकांच्या [illegible] हकीकत आली आहे त्याव[illegible] प्रकार विशेष भयंकर दिसत[illegible]

आर्मेनियनलोक मोठ्या [illegible] कडे समक्ष अर्ज देण्यास जात होते हा [illegible] चा आरंभ झाला. पोलिस त्या जमावास हरकत करूं लागले; स्वारीचे लोक तंट्यास उठले अर्थात त्यांनीं हत्यार सुरू केलें. एक मेजर कामदार ठार झाला व दंगेखोर सगळ्या शहरांत मिरवं लागले.

अ० ट०

माल... ... ... ... ... ... ... ...
डअखेर ... ... ,, १०८
कोळ ... ... ... ... ४४

नोटिशी बद्दल.
१० ओळींचे आंत रु० १
दर ओळीस .... ०।०६
दुसरे खेपस .... .... ०।

Six monthly ... ... ... 3 ,, 8 as.
Single copy ... ... ... ... ... 4 as.

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs.
Per line over 10 ... 4 as.
Repetition Per line 3 as.

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXIX AKOLA MONDAY 28 OCTOBER 1895 NO 41

वर्ष२९ आकोला सोमवार तारीख २८ माहे आक्टोबर सन १८९५ इ० अंक ४१

### नोटीस

ती० रमाबाई मर्द नागोजी हांडे राहाणार मुंडगांव ता० अकोट जात माळी हीस नोटीस देणार भगाजी वल्लद रामजी माळी हांडे राहणार मुंडगांव ता० अकोट नोटिशीनें असें कळवितो कीं नागोजी वल्लद विष्णाजी माळी हांडे हा माझा साक्षात चुलत आजा व तुमचा नवरा हा मयत होऊन आज सुमारें सवा महिना होत आला. याच्या खातेची शेती एकंदर टिफन ३॥ साडेतीन आहे. त्याचा तपशील मुंडगांवास टिफन १॥ दीड व लोहारीस टिफन २ अशी मिळून साडेतीन तिफनची आहे. व राहाते घर मुंडगांवास आहे त्याचा तपशील घर खांब २४ चोवीसचें धांबें व वरापुढें तीन आढ्याचें खपरेल आहे. तर ही जिनगी तुह्मी विकून जाणार आहा असें आह्मास समजलें आहे ह्मणून तुह्मांस ह्या नोटिशीनें असें कळविलें जातें कीं तुह्मी मजपाशी चांगल्या रीतीनें राहिल्यास तुह्मांस अन्नवस्त्र मी देण्यास तयार आहे. तर तुह्मी सदहू शेती ज्यांत माझा निम्मा हिस्सा आहे ती व घर व खपरेल असे विकूं नये. तुह्मांस विकणेचा वगैरे कोणतेही प्रकारचा अधिकार नाहीं. ह्मणून तुह्मांस हें नोटिशीनें अगोदर कळविलें आहे हें तुह्मास कळावें ह्मणून दिली नोटीस ता. २४ माहे अक्टोबर सन १८९५ इसवी

[ सही ]

भगाजी वल्लद रामजी माळी हांडे रहाणार मुंडगांव निशाणी वखर दस्तुर शामराव चंद्रभान देशमुख मुंडगांव.

---

### नोटीस

रा. रा. पन्नालाल वा मलजी मारवाडी दुकान मुंडगाव तालुके अकोट यांस नोटीस देणार भगाजी वा रामजी माळी हांडे राहणार मुंडगांव नोटिसीनें असें कळवितो कीं नागोजी वा विष्णाजी माळी हांडे हा माझा साक्षात चुलत आजा. हा मयत होऊन आज सुमारे सवा महिना होत आला. नागोजी यांची बायको नामे रमाबाई ही आमची आजी विद्यमान आहे. नागोजी याचे स्थावर जंगम जिनगीचा वारस मी आहे. नागोजी यानीं तुमचे दुकानचे कांहीं देणें आहे असे मजला समजतें तर ह्या नोटिसीनें तुह्मास असें कळवितो की तुमचे जे कांहीं देणें असेल ते चार पंचा समोर कागद पत्रानें मजला कळवावें व जे रास्त आहे ते पंचा समोर बेऊन जाऊन पावती घ्यावी, अते तुह्मास अगोदर कळविले आहे.

तुह्मी आमचे आजे मयत नागोजी यांच्या खात्याची शेती टिफन ३॥ साडेतीन ची आहे. त्याचा तपशील मुंडगांवास १॥ टिफण, व लोहारीस २ दोन टिफनची व राहते घर, धांबे खांब २४ चोविसचे व पुढील खपरेल तीन आढ्याचे. ही जिनगी स्थावर व आणखी कांहीं जंगम जिनगी ह्या पैकीं कोणची ही तुह्मी आपले कर्जात, गाहाण, अथवा खरीदी आमच्या समती शिवाय घ्यालतर त्याजबद्दल सदरहू जिनगी किंवा आमची आजी नामे रमाबाई अगर आह्मी कोणाच्या ही प्रकारानें जबाबदार नहीं. ह्मणून दिल्ही नोटीस तारीख २४ माहे अक्टोबर सन १८९५ इसवी.

सही

भगाजी वल्लद रामजी माळी हांडे राहणार मुंडगांव दस्तुर शामराव चंद्रभान देशमुख राहणार मुंडगांव.

---

### जाहिरात

सर्वत्र लोकांस या जाहिरातीनें भगाजी वल्लद रामजी हांडे माळी रहाणार मुंडगांव जाहीर करितो कीं नागोजी वल्लद विष्णाजी माळी हांडे रहाणार मुंडगांव हे आमचे साक्षात चुलत आजे हे मयत होऊन आज सुमारे सव्वा महिना जाहला. रमाबाई मर्द नागोजी ही आमची आजी विद्यमान आहे, नागोजी वल्लद विष्णाजी यांची शेती, घर, आणखी जंगम जिनगी जी आहे ती जर कोणी रमाबाई यांच्या पासुन बक्षीस, गहाण अगर खरेदी आमचे संमती शिवाय घेईल तर रमाबाई, जिनगी, स्थावर किंवा जंगम त्याजबद्दल कोणचेही प्रकारचे जबाबदार नाहीं. ज्याचा तो आहे, ह्मणून दिली जाहिरात ता. २४ माहे अक्टोबर सन १८९५ इसवी

( सही )

भगाजी वल्लद रामजी माळी हांडे रहाणार मुंडगांव निशाणी वखर दस्तुर शामराव चंद्रभान देशमुख रहाणार मुंडगांव.

वऱ्हाडसमाचार

मिती कार्तिक शुद्ध १० शके १८१७

न्यायाधीश कायद्यांत निष्णात, लेखणीचा फर्डा, मनुष्यस्वभावाचा पूर्णवेत्ता, आणि निःपक्षपाती असा असावा लागतो, आणि अशा प्रकारचे गुणसंपन्न लोक न्यायासनावर आरूढ असले ह्मणजे प्रजा जनांचे कल्याण आणि न्यायदरबारची थोरवी हीं कायम राहतात. न्यायाधिशाच्या अंगीं अवश्यक लागणारे सद्गुणा संबधानें परीक्षा वरोवर होत नाहीं आणि त्या मुळें न्यायाधिशाच्या कामाला अयोग्य असे बहुत लाक त्या अधिकाराला दुसऱ्या कांहीं कारणामुळें पोंचतात. न्यायाधीश उतावळ्या स्वभावाचा हलक्या कानाचा, वचनाचा कच्चा व पैशाचा लालची असा असला ह्मणजे किती लोक ठार बुडतात, अब्रूला आंचवतात व शिक्षेच्या हालअपेष्टा भोगतात याचा नेमच रहात नाहीं. मुंबई इलाख्यांत न्यायाधिशांची निवड परीक्षे शिवाय होतच नाहीं ह्मणून तिकडील न्यायखात्यांचें काम वर्णनीय होत असतें. परंतु आमच्या वऱ्हाड प्रांतीं न्यायाधिशाच्या जागेला योग्य मनुष्याची निवड बहुधा होत नाहीं, आणि नवल इतकेंच कीं चांगले चांगले नांवा जलेले वकील न्यायाधिशाच्या कामाला मिळत असूनही त्यांच्या हक्काकडे लक्ष्य न जातां नवशिक्या लोकांची भरती बहुत होत असते आणि त्यामुळें रयतेचें नुकसान मोठें होतें. दिवाणी कामांत मनुष्य फसला तर त्याची जिनगी बुडते पण फौजदारी कामांत चांगल्या न्यायाधिशाच्या अभावामुळें आरोपी फसला तर सर्व जीव जी काय अब्रू तीही नष्ट होते. वऱ्हाडांत माजिस्ट्रेटचे अधिकार फार घाई घाईनें दिले जातात ही गोष्ट मोठी घातुक होय. न्यायाधीश चांगला कामांत कसलेला असल्या शिवाय त्याला मोठे अधिकार देण्यांत येऊं नयेत असें सर्वांस वाटतें पण सरकार अगोदर कच्चे व अनुभवशून्य लोकांस न्यायाधीश नेमतें. आणि नंतर न्यायदरबारचें रहाट सुयंत्र चालविण्यासाठीं त्या अनधिकारी लोकांस अधिकारसंपन्न करिते ह्मणून अनेक विपरित परिणाम दृष्टीस पडतात.

वऱ्हाडांत वकिलांचा समूह मोठा आहे आणि प्रांताच्या विस्तार मानानें तो बराच मोठा आहे. वकिलांची विद्वत्ता लक्षात घेतली ह्मणजे न्यायाधीशांचा वर्ग अगदीं खालच्या दर्ज्याचा भासतो. चांगले शिकलेले, सवरलेले दीर्घ अनुभवी, व दृढ व्यासंगी वकील बहुत आढळतील आणि त्यांच्या गुणैश्वर्यप्रमाणें त्यांस मोठमोठ्या हुद्यांचीं व महत्वाचीं कामें फार चांगलीं शोभतील. न्यायाच्या कामांत ते उत्कृष्ठ कसाला लागून ताऊन सुलाखून निघालेले असतात. हल्लीं वकील न्यायाधिशाच्या कामाला पुष्कळ उपलब्ध आहेत तथापि असे हुशार, कायदेपंडित वगळले जाऊन भलताच कोणी मनुष्य मोठ्या हुद्यावर कांहीं तरी कृत्रिम कारणांनीं नेमिला जातो हें वऱ्हाड प्रांताचें दुर्भाग्य होय!

आतां हें खरें कीं 'उडीदा माजी काळे गोरे' या न्यायानें कांहीं जुने न्यायाधीश जसे पाहिजेत तसे विचारशील, अनुभवी, कार्यदक्ष निःपक्षपाती आहेत आणि त्यांच्याच नांवामुळें वऱ्हाडांतल्या न्यायखात्याला शोभा आहे. सुमारें ४०।५० न्यायाधीश चार सहा महिन्यापूर्वी पटावर होते पण त्यापैकीं कायद्याच्या परीक्षेंत निभावलेला किंवा कायद्याच्या ज्ञानांत श्रेष्ठपदाला पावलेला असा एकही न्यायाधीश नसावा ही मोठ्या आश्चर्याची गोष्ट आहे.

आमचा लेख सर्वांशीं लागू नसला तरी सामान्यपणें वस्तुस्थितीचा द्योतक आहे. सुधारणा व्हावी, विद्येला मान मिळावा, अक्कलेची पारख व्हावी आणि योग्य मनुष्य योग्य स्थळीं यावा एवढीच इच्छा आहे आणि ती या लेखानें सरकारास चांगली उमगली ह्मणजे कार्यभाग निम्मा उरकला. नाहीं तर,

रोगियासी विषतुल्य तें मिष्टान्न ।
तोंडासी कारण चवी नाहीं ॥

या तुकारामाच्या उक्ती प्रमाणें चांगल्या उद्देशाचाही विपरीत अर्थ होण्याची भिती आहे ह्मणून हें ध्वनित केलें आहे. जुडिशिल कमिशनर मि. आवर्ड हे स्वतां कायद्यामध्यें पारंगत, गुणग्राही, व कार्यकुशल आहेत तेव्हां त्यांच्या अधिपत्याखालीं कांहीं उपयुक्त सुधारणा वरील दिशेनें होतील अशी आह्मास आशा आहे.

---

परिणाम वाद ह्मणून अलिकडे एक निराळाच शास्त्रमार्ग निघाला आहे. या वादाचें मूल तत्व असें कीं कारण व तत्कार्यें हीं एका शृंखलेंत गोंविलीं आहेत आणि ही कार्य कारणांची सांखळी गुप्त असली तथापि सृष्टीतल्या प्रत्येक पदार्थाचें स्वरूप या परिणाम वादाचे निदर्शक आहे. कारण व त्या भोंवतालच्या उपाधि यांचा परस्परावर परिणाम होऊन कार्यनिष्पत्ति निराळीच होते. पुन्हा तेंच कार्य कारणभूत होऊन उपाधिक गोष्टींच्या सामर्थ्याप्रमाणें तिसरेंच कार्य उपलब्ध होतें. या प्रकारें परंपरेनें विविध सृष्टी होत चालली आहे. या परिणाम वादाच्या गर्भित अर्थानें ईश्वरी कर्तृत्व पुष्कळ अंशांनीं निरस्त केलें आहे. आपोआप सृष्टीच्या नियमाप्रमाणें कार्य कारणभावानें सर्व जगत व्याप्त आहे आणि पदार्थ मात्राची उत्पत्ती, स्थिति व लय हीं ईश्वराधीन नसून कारणमालेच्या आधीन आहेत या परिणामवादाचा ठळक दाखला ह्मणजे मनुष्याच्या उत्पत्तीविषयीं डारव्हिन तत्ववेत्याचें मत होय. मनुष्याचें मूळचें रूप माकडाचें होतें असें शोधकाचें मत आहे. या वादाचा एक मोठा फायदा आहे तो असा कीं वस्तुमात्राचें निदान करितें वेळीं त्याची कारणमाला थोडी बहुत कळून येते आणि कारणमाला कळल्यापासून मनुष्यानें नानाविध सृष्टिचमत्कार केले आहेत. कोणत्याहि गोष्टीची कारणें समजलीं ह्मणजे सृष्टपदार्थाच्या उत्पत्तिस्थानापर्यंत मनुष्याची कर्तृमकर्तृ शक्ति पोंचली आणि सृष्टीवर मनुष्याचें साम्राज्य वाढलें असें मानता येईल.

हा परिणामवाद जसा मनुष्याच्या उत्पत्तीला लावितात तसा मनुष्याच्या नैतिक

व सांपत्तिक उत्क्रमणालाही चांगला लागूं पडतो. हा विचार नीति विषयक व संपत्ति विषयक दृष्टीनें पक्का झाला तर जगाचा मोठा फायदा होईल. सृष्टीमध्यें प्रत्येक मनुष्यास आपापल्या मना प्रमाणें वागतां आलें असतें तर एकंदर भूगोळावरजेनें मागील पिढी पेक्षां पुढील पिढी नीतिदृष्ट्या अधःपतन पावली असती पण सृष्टीमध्यें जो जीवनकलह चालूं आहे त्या योगानें वाईटसाईट गोष्टींचें निर्मूलन होऊन उत्तम वस्तूच अखेरीला टिकते; आणि ह्मणूनच मनुष्याच्या नीतिसंपदेला धक्का पोंचत नाहीं.

---

यंदा पुण्यास राष्ट्रीय सभेची बैठक कशी काय निभावते या बद्दल सर्वत्रांस मोठी काळजी आहे. मि. ए. ओ. ह्यूम हे जनरल सेक्रेटरीचीं सूत्रें लोकांच्या स्वाधीन करून विलायतेस गेल्या मुळें राष्ट्रीय सभेचें काम जबाबदारीनें झालें आहे. पुणें शहरीं सध्यां वादाचें प्रचंड वादळ सुटलें आहे. आणि त्या तडाख्यांत काय काय चमत्कार दृष्टीस पडतील याचा नेमच नाहीं. आपापसांत दुही माजून लोकांचीं मनें सार्वजनिक कार्या विषयीं उद्विग्न झालीं आहेत. तंट्याचा विषय सामाजिक परिषद होय. कित्येकांस ही सामाजिक परिषद नको. त्यांच्या पुढाऱ्यांच्या मतें ही सभा ह्मणजे "आपल्या आयाबहिणींना नसतीं दूषणें लावण्याची चावडी" होय. ही सामाजिक सभा इतकी निंद्य व त्याज्य असूनही ती वर्षानुवर्षे राष्ट्रीय सभेच्या मंडपांत भरत असते. या गोष्टीच्या प्रतिकारा साठीं पुष्कळजण कंबरा बांधून सामाजिक सभेला तिलांजली देण्यास उद्युक्त आहेत. पुण्यास सभांची धुमाकुळी माजली आहे. चार चार पांच पांच हजार लोकांच्या सभा भरल्या होत्या आणि अनेक ठराव करण्यांत आले त्यांचा मतितार्थ असा कीं राष्ट्रीय सभेचा मंडप यंदा सामाजिक परिषदेला द्यावयाचा नाहीं. त्यांच्या मता विरुद्ध जर सामाजिक सभा त्याच मंडपांत भरवावयाची असली तर राष्ट्रीय सभेलाही खों देऊं अशी दहशत घालण्यांत आली आहे. अंशतः ह्मणा किंवा सर्वांशीं ह्मणा, नामदार बाळ गंगाधर टिळक हे या चळवळीच्या बुडाशीं आहेत हें पाहून मोठें आश्चर्य वाटतें.

सामाजिक सभेचा अध्वर्युपणा निव्वळ पुणेकराकडे नाहीं हें ठीक आहे. अगोदरच त्यांनीं बहुत उच्छाद मांडला आहे. दुःखांत सुख एवढेंच कीं राष्ट्रीय सभा नको असा सामाजिक सभेच्या द्वेष्ट्यांचा विचार नाहीं. परंतु सामाजिक सभेचा नाश करण्या साठीं राष्ट्रीय सभा बुडली तरी त्याची फिकीर नाहीं. राष्ट्रीय सभा जगो अगर मरो, सामाजिक सभेचें निर्मूलन होईल तरच ही द्वेष्टी मंडळी संतुष्ट होईल. कित्येक इतके उतावेळ झाले आहेत कीं येत्या बैठकीची व्यवस्थापक मंडळी लोकनियुक्त नाहीं. तेव्हां ती अनाधिकारी असल्या मुळें तिचीं कृत्यें रद्द समजावींत असें ते ह्मणतात. पुण्याचा असा बेदा व फाटाफूट हीं ऐकून सातारकरांनीं यंदाची बैठक साताऱ्यास भरविण्या विषयीं आग्रह धरला आहे आणि वाईकर प्रमुख लोक ' मोदवृत्त ' द्वारें कळवितात कीं कृष्णेच्या घाटावर सहस्रभोजन करण्याचा चांगला अनुभव आहे तेव्हां गरिबी थाटावर राष्ट्रीय सभेची व्यवस्था वाईस देखील करण्यास कांहीं कठीण नाहीं

आपल्या देशाला सर्व ग्रह अती वाईट आले आहेत. ज्या दिशेनें विघ्नें उद्भवण्याचीं स्वप्नें देखील नव्हतीं तिकडून तीं आपल्या सर्व परिवारासह दत्त ह्मणून उभीं राहिलीं आहेत. पार्लमेंटांत प्रधान मंडळ बदललें व आपल्यास प्रतिकूल कानसरव्हेटिव मंडळी अधिकारावर आली मि० दादाभाई यांस पार्लमेंट सोडावें लागलें. ब्रिटिश कमिटीचा उद्योग बहुत खालावला आहे पुष्कळ कळवळ्याचे गृहस्थ निवडले गेले नाहींत. राज्यकारभाराची शीस्त उदारपणाची नसून नेटिवांस उत्तरोत्तर सरकारी अधिकारापासून पराङ्मुख करण्याची आहे. अशा संकटसमयीं १०।११ वर्षें लोकानुग्रहानें निभावलेल्या व उपयुक्ततेच्या कसोटीस लागलेल्या राष्ट्रीय सभेस अचिंतित विघ्नें पुण्यासारख्या शहरच्या लोका कडून येत आहेत हें कालचक्र फिरल्याचें चिन्ह होय. राष्ट्रीय सभेच्या बरोबर थोडी मागून सामाजिक सभा भरूं लागली आणि तिच्या बैठकीही सालोसाल निर्विघ्नपणें भरत गेल्या पण इतकीं वर्षें अव्याहत चालल्यास या दोन राजकीय व सामाजिक राष्ट्रसंस्थावर यंदा पुणेकरांच्या अक्कलेच्या भुईनळ्यानें भडिमार सुरूं केला आहे. पुणेद्वेष्टी मंडळी ह्मणजे कांहीं इंडियन राष्ट्र नाहीं परंतु नाश करण्याची शक्ती व्यक्तिमात्राची फार मोठी आहे या न्यायानें वरील दोन्ही बहुत वर्षांच्या संस्थांस कांहीं धक्का पोचतो कीं काय ह्मणून मोठी भीति आहे. या दोन संस्था उभारण्यास किती भगीरथ प्रयत्न पडले आणि त्या सुयंत्र चालून हितावह व लोकमान्य होण्या साठीं किती खटपट पडली व काल लागला हें वरवर विचार करणाऱ्यांसही कळणार आहे. राजकीय बाबतींत जितकें बहुतांशीं लोकांचें एक मत होतें तितकें सामाजिक बाबदींत होत नाहीं हें आह्मी नीं कबूल करीत नाहीं. लोकमत नानाविध व विचित्र आहे तथापि सामाजिक सभा नको असे कांहीं ठरत नाहीं. सामाजिक सभेच्या बैठकीला प्रतिकूल लोक कांहीं कमी नसतात तेव्हां त्यांनीं आपल्या मतदर्शनानें सामाजिक सभेचे कांहीं ठराव पसंत करूं नयेत. बहुमतानें सभा व सभेतला जनसमूह चालत असतो तेव्हां बहुमत जिकडे होईल त्या दिशेनें सभेचें काम चालत असतें. असें असतांना देखील सामाजिक सभा नको आणि ती भरल्यास निदान राष्ट्रीय सभेच्या मंडपांत भरूं नये अशा प्रतिपादनांत आह्मांस कांहीं तात्पर्य दिसत नाहीं. सामाजिक सभेचे कांहीं ठराव निव्वळ भावी सुधारणेचे मार्गदर्शक असतात; ते ज्यास पसंत नसतील त्यांनीं तो मार्ग सोडावा. अखेरीस लोकमत ज्या ज्या गोष्टीला जसजसें तयार होत जाईल त्या त्या गोष्टी तसतशा रूढ होतील आणि लोक मोठ्या आनंदानें ग्रहण करितील. सामाजिक सभेला राष्ट्रीय स्वरूप प्राप्त झालें आहे आणि ही राष्ट्रसंस्था आतां मोडेल असें संभवत नाहीं. तिचीं कार्यें लोकमताची गति व सुधारणेची दिशा दाखवीत असतात.

बरी हावो किंवा वाईट होवो, राष्ट्रीय सभा यंदा पुण्यास भरणार हें खचित आहे आणि राष्ट्रीय सभेच्याच मंडपांत सामाजिक सभा निदान यंदा तरी भरणार हेंही निर्विवाद आहे. पुढील वर्षाच्या सभा यंदाच्या बैठकींत पसार होणाऱ्या ठरावांच्या अनुरोधानें एक स्थळीं किंवा भिन्न स्थळीं भरतील पण या प्रश्नाचा निकाल आज कांहीं होत नाहीं हें कळविलें ह्मणजे पुणेकर द्वेष्ट्या मंडळीचें अकांड तांडव येत्या बैठकी संबंधानें किती निरर्थक आहे हें उघड होईल.

---

मुंबई हायकोर्टाचे न्यायाधीश नामदार बेली साहेब पेनशन घेऊन गेल्या मुळें त्यांच्या रिकाम्या जागीं मि. बद्रुद्दीन तय्यबजी बारिस्टर यांस स्टेट सेक्रेटरी यांनीं नेमल्या विषयीं बातमी कळतांच सर्व देशभर आनंदोद्गार निघूं लागले आणि या नेमणूकी प्रीत्यर्थ अभिनंदनद्योतक महोत्सव होऊं लागले. परंतु हल्लीं इंडियाच्या घड्याळाचा काटा मागें फिरला आहे. कांहीं तरी विचित्र वार्ता उठतात व त्या खऱ्या ठरतात. विलायतची तार सांगते कीं मि. आरथर स्ट्रेची नांवाचे जे तरुण बारिस्टर अल्हाबादेस राहतात त्यांची नेमणूक नामदार बद्रुद्दीन यांस रद्द करण्यांत आली आहे. स्टेट सेक्रेटरींनीं ही नेमणूक कोणत्या तत्वावर केली हें कळत नाहीं. नामदार बद्रुद्दीन व नवे बारिस्टर स्ट्रेची यांची तुलना सुद्धां शक्य नाहीं. नामदार बद्रोद्दीन यांची विद्वत्ता, कायदेपांडित्य मोठा अनुभव, सार्वजनिक गोष्टींत पुढारीपणा, सद्वर्तन, वक्तृत्व मिळून सर्व गोष्टीच सर्वत्र विख्यात आहेत. आणि मि० स्ट्रेची यांचें नांव देखील कोणास फारसें ऐकून ठाऊक नाहीं. परिसाला किंवा कोहिनूर हिऱ्याला टाकून लोखंडाची किंवा कोळशाची निवड करण्यांत आली हा दोष कांहीं परिसाचा किंवा कोहिनूरचा नाहीं. जेथें त्यांचें वास्तव्य तेथला सर्व प्रदेश सुवर्णमय किंवा तेजोमय तो करून सोडलिच. गुणग्राहीपणाचा अभाव व नेटिवांच्या उत्कर्षा विषयीं असहिष्णुत्व या दोन भिंगाच्या उपनेत्रानें सर्व गोष्टी स्टेट सेक्रेटरीस विपरित दिसल्या ह्मणून त्यांनीं त्या नीट करण्याची संधि साधली!

---

The Berar Samachar
MONDAY OCTOBER 28, 1895

Last year much activity was called into play in the province of Berar owing probably to the ardent desire of the masses to make themselves heard in respect of the hardships involved in the then proposed enhanced scale of assessment rates. No sooner was it made known to the public at large that the Berar Government intended to enhance the assessment rates under cover of a belief that a low rate of assessment was hardly compatible with the highly progressive condition of Berar, than the people got alarmed and excited. The ignorant looked upon the action of the Goverment with nothing less than horror distrust and despair. They tried meekly to sustain the faint and fickle hope that the Government would pause and think calmly over the inexpediency and unsoundness of its proposed policy rather than precipitously proceed to carry through its ends in open defiance of public representations and remonstrations. They implicitly believed that no hasty steps would ever be taken by the Government in the matter of assessment which once decided one way or the other, is largely to affect political harmony. They belived that while the Berar soil was deteriorating in quality year by year for various reasons, and the country getting impoverished no humane administrative head would ever think of proposing and much less of putting into effect, a scheme calculated to subject the Government to universal calumny & condemnation. Want of fodder appears conspicuously responsible for the rapid decay of cattle. With the decay of cattle manure becomes scarce and the cultivation most burdensome and expensive. The great majority of masses being only half fed, are unable to meet the necessary daily expenses of their living much less of cultivation. Ease and comfort are things to which the ambitions of the masses can never rise. Their strength, courage, spirit, energy and liveliness have all disappeared. Half fed and clothed they are overworked. Education in the proper sense of the term becoming dearer, is inaccessible to the majoity of the masses. Elementary culture is only half given and not systematically diffused. Many hard and restrictive measures are taken to limit the scope of higher education to as small a number of aspirants as possible. The large sphere for human activity is being gradually narrowed down to grooves whose capacities are many times overlooked and often overtaxed. In such an imminent struggle for life, therefore, the masses can hope to keep up their head only if they take a calm, patient and comprehensive view of all their surroundings and take heart and persistently and faithfully direct their energis to a proper goal with the aid of a trusted and capable guide whose sole aim should be to serve the masses for the sake of masses in full view of what is good and convenient under the constantly changing conditions of the country.

With a people thus niggardly fed and clothed and extremly low—cultured it is a common thing helplessly to place an implicit belief in the Government in all things no matter how they shape them and frame them

The masses had thus assumed a very passive attitude. The wiser among them had the courage to speak to their neighbours about the hardship of the proposed enhancement of assessment.

The matter there became a general topic and formed a proper subject for open discussion. Meetings were held in several localities & the inexpediency of the proposed scheme was attempted to be vividly placed before the public. The evil consequences with which the scheme was frought, becoming universally visible, gave rise to a strong and ever increasing band of opponents to the scheme. Meetings at scattered places were thought to be no sure and certain indication of a universal belief in the inexpediency of the proposed scheme. A large mass meeting was therefore convened at Akola last year in the month of November which was attended by thousands. The keen enthusiasm and activity displayed on the occasion are yet alive in the memory of those who were present at Akola to witness the scene. The meeting was a fully representative body. The assessment question was much debated and the people spoke out their hearts in full and feelingly. There was all oneness of heart and an anxious desire for the alleviation of their grief ran through every heart. Resolutions were unanimously passed & the proceedings terminated with complete success. Acting upon such resolutions, the Sarvajanik Sabha of Berar prepared a memorial to be submitted to the Berar Goverment. The memorial was only submitted but seems to have had little practical effect. The assessment rates are inspite of all those representations enhanced. The Government has found out a summary mode of publicly declaring the enhanced rates. The cultivators were called in numbers and

the rates are read out to them. This speedy mode saves much time and shows a great amount of work done in short time. The people come to the officer entrusted with the work of declaring the enhanced rates to them, hear the rates and turn back forgetful of what they heard. A cultivator who hears himself charged Rs. 9—7—5 comes back and tells his friend that he is charged 5—7—9 or 7—5—9 or 7—9—5 or some such thing.

(to be continued)

The Sanitary Report for 1894 is a valuable record for a number of reasons. It is full in detail, and most terse and logical in argument. It marshalls a vast collection of statistical tables in a masterly manner and lays down a good number of practical suggestions for future guidance. Before we review it we would prepare the ground for a full understanding of the report by quoting some of the most important paras in the eloquent words of Doctor Little himself. Let one read with deep interest what he says about the general sanitary progress in Berar:—

"Sanitary progress in connection with municipalities has been fair. The water supply for Akola has approached completion, and a scheme for the disposal of the town sullage has received sanction, by which the sullage will be applied to properly prepared land, with, it is anticipated, resulting profit to the municipality.

The completion of the drainage of Amraoti has also come within appreciable limits of realization, since the very expensive scheme drawn up five years ago, and estimated to cost between four and five lakhs of rupees, is to be abandoned.

The sullage is also to be utilized for land irrigation similarly as suggested for Akola.

Should these farms prove a success other municipalities will probably adopt the same method of disposal of their drainage, which is everywhere faulty at present.

The subject of village sanitation has continued to receive attention. The question of the necessity for a sanitation law was considered by a committee, and a report submitted for the Resident's information. We have a very simple, but effective, code of rules for village sanitation, which has been approved of by the Government of India, but unfortunately they cannot be enforced, and it is perfectly hopeless to expect the villager to voluntarily carry out any system of sanitation, however simple.

The great difficulty, however, in Berar, is the want of land round villages for public purposes, to which attention has been repeatedly drawn in these reports. This gives rise to intense fouling of the village site and precincts, so bad, especially in the monsoon, that no one who had not seen it could have any conception of the condition. The first step is to acquire land round every village in order to relieve the present overcrowding, and to provide retiring grounds for purposes of nature, for storing manure, skinning dead animals, and cremation grounds. This will cost much money, still it is only fair that the mistake originally made in assessing the land up to the inhabited area should now be rectified".

Dr. Little attempts ably to generalize the causes of fluctuations in births and deaths during the year under report. He says:—

"I have the honor to state that the general belief is that the low birth-rate and high death-rate are due to failure of good crops during the last three years and the consequent high rate of prices, and also to the prevalence of fever and want of proper food and treatment."

"In this instance the cause or causes in operation were evidently of a general nature, the results in each district being more or less uniform.

As affecting the people, the principal feature of the year was the prevalence of epidemic disease. In the latter part of 1893, commencing from August, mortality, espacially from fever, was very high, and continued throughout 1894.

Influenza prevailed in the earlier part of the year, and grew to the intensity of an epidemic in March, April, and May, carrying off numbers of the population, especially children and old people.

Epidemic sickness and mortality are positive checks to increase of population; and these causes would seem to have been the predominant factors in this instance in checking reproduction. Other causes may also have been in operation but they are not deducible from the statistics.

Naturally we would expect that the increase of sickness commencing in August, 1893 would begin to make itself felt about the following April, on the assumption that during seasons of sickness fewer conceptions take place, and a larger proportion of early pregnancies is likely to end in abortion. This in a measure is borne out by the figures in the above table."

The following is the financial condition of the telegraphic department in India for the last year:—

"The Revenue receipts amounted to Rs. 80,39,675, being an increase of Rs. 32,369 over the figures for the previous year. As explained in paragraph 14 of the Report, the rent charges received from the East Indian railway were revised and reduced during the year under review in accordance with the recommendations of a Committee appointed by the Government of India to investigate these charges. A sum of Rs. 4,31,762, being the approximate rebate due to the Railway for the seven years from 1st. January 1887 to the 31st December 1893, was credited to the Railway during the year of which sum Rs. 83,000 represented the share of the rebate appertaining to 1894-95 The balance (Rs. 4,31,762—Rs. 83000 ) Rs. 3,48,762 was, therefore, a charge to the Revenue Accounts of the year for which they were not responsible. Including this sum the gross revenue receipts amounted to Rs. 83,88,437 as agaainst Rs. 80,39,675 shown in the accounts.

The Revenue expenditure amounted to Rs. 56,93,218, being an increase of Rs. 3,88,457. The net receipts thus amounted to Rs. 23,46,457, showing a decrease of Rs 3-56,088. The Revenue receipts in, clude Rs. 12,09,845 on account of State messages, and Rs. 1,14,572 on account of news-free and other *pro forma* revenue, the net receipts amounted to 3.89 per cent. on the capital outlay".

The gross value of the yield for 1893-94 was Rs. 4,79,724, or Rs.47,518 in excess of the amount of 1892-93, which was Rs. 4,32-206. The increase is against "timber," "grazing" and "miscellaneous." The increase in "grazing" is due to additional care in checking passes and to increased rates; also to the fact that grazing for two seasons were credited within one year. Under "miscellaneous" the sales of "hilda" in the Melghat have contributed largely to the increase. The crop was collected under Government supervision, and the arrangements for collection and sale were conducted by Mr. Calthrop, the Divisional Officer, and Mr. Misriprasadh, who was in charge of Bairagarh. The Conservator says the arrangements made were so admirable that the result of the undertaking was a gross income of Rs. 21,000 and a net return of Rs. 10,000 against ordinary receipts from this source about Rs. 900. There is a very slight falling-off against "fuel," but the decrease against "bamboos" is considerable. The explanation is that in the summer of 1893 "exports rose rapidly and good prices were obtained; apparently the exporters glutted the market and from February 1894 prices fell, and the demand was very slack up to the end of the year." There was a good growth of grass all over the country owing to timely rain in September 1893, which accounts for the fall in grass sales.

To maintain the forest revenue at its present figure, and to attain to an average of five lakhs a year, the plan which the Conservator recommends is to "open up our forests and encourage export and to develop the sales of minor produce." This involves a temporary increase in expenditure resulting in a temporary reduction of the surplus, but the Conservator shows that it is the only feasible plan, and the end in view after all is an improvement of forest revenue.

Forest Report.

## वऱ्हाड

खामगांवच्या तिसरे वर्गाच्या बेंच माजिस्ट्रेटांस पोलीस आक्टातील ३४ व्या कलमा खालील ५ व ७ या पोट नियमांत येणाऱ्या अपराध्यांची ( समरी ) संक्षिप्त चौकशी करण्याचा अधिकार देण्यांत आला ह्मणजे रस्त्यावर जो कोणी घाण करील किंवा जो कोणी आपलें शरीर सार्वजनिक स्थळीं बीभत्सपणें उघडें टाकील त्यांची चौकशी संक्षिप्त रीतीनें करण्यांत येईल.

इंडियन फ्याक्टरी आक्टा अन्वयें फ्याक्टरी तपासण्याचा अधिकार तहशिलदार, स्पेशल माजिस्ट्रेट, असिस्टंट कमिशनर व एक्स्ट्रा असि. कमिशनर यांस त्यांच्या हद्दी पुरता देण्यांत आला आहे.

क्यापटन आयव्हर्स असिस्टन्ट कमिशनर व मि. वाल्श एक्स्ट्रा असि. कमिशनर यांस अनुक्रमें माजिस्ट्रेट वर्ग २चे व वर्ग १चे अधिकार देण्यांत आले.

कर्नल लेन इनस्पेक्टर जनरल यांस तारीख २५ सप्टेंबर पासून एक वर्ष पर्यंत फर्लो रजा मिळाली आहे.

मि. सय्यद झेन उल-अबुदीन बिलग्रामी यांस आनररी अव्वाची वऱ्हाडांत नेमून तिसरे वर्ग माजिस्ट्रेटचा अधिकार देण्यांत आला. हल्लीं यांची नेमणूक उमरावतीस झाली आहे व त्यांच्या कोर्टास २रे वर्ग तहशिलदारीचे अधिकार दिले आहेत.

नवे नेमलेले एक्स्ट्रा असि. कमिशनर मि. एडवर्डस यांची नेमणूक उमरावतीस झाली.

गेल्या आठवड्यांत सेशन कोर्ट अकोल्यास चालूं होतें. एकंदर तीन मोकद्दमे होते त्यांचा तपशील येणें प्रमाणें:—

(१) केळोद ता० चिखली येथील उकर्डा नांवाचा पाटील आरोपी होता. त्याच्यावर आरोप त्याच्या भाऊबंदा पैकीं पाटलाला जादू करून ठार मारण्याचा प्रयत्न केल्याबद्दलचा होता. आरोपी दोषमुक्त झाला. हा खटलाच सेशन कोर्टाकडे धाडण्या सारखा मजबूत नव्हता. खालच्या माजिस्ट्रेटांनीं पक्की चौकशी केल्यानंतर शाबितीची कांहीं आशा दिसल्या खेरीज सेशनकडे खटले धाडूं नयेत.

( २ ) खामगांव कडील तान्या नांवाच्या तेल्यानें बहुत वेळा चोऱ्या केल्याचें शाबीत झाल्या वरून त्यांस काळ्या पाण्याची जन्मठेप दिली.

( ३ ) बुलढाण्या कडील तिवा वंजारी बंधूंनीं दोन शेळ्या चोरून एकीचा फन्ना उडविला होता. पोलिसानीं त्यांस हजर मालानिशी पकडलें. आरोपीस अनुक्रमें ४ वर्षे, ३ वर्षे व ३ महिने अशा शिक्षा झाल्या.

मि० एम. पी. वाल्श एक्स्ट्रा असि० कमिशनर अकोला हे दोन महिन्यांच्या हक्काच्या रजेवर आज पासून गेले.

मि० सी. शामराव अव्वाची, वाशिम यांस तीन महिन्यांचा हक्काची रजा मिळाल्या प्रमाणें ते येत्या नोवेंबर महिन्या पासून रजेवर जात आहेत.

मि० सिम्सन आफि० डेपुटी कमिशनर यांची स्वारी खामगांव- जळगांव तालुक्यांत फिरत आहे.

रा. रा. काशिनाथ श्रीराम जठार अव्वाची व मि० वाल्श ए० असि० कमिशनर हे हायर स्टांडर्ड व मि. अबदूल अझिज नायब तहशिलदार अकोला हे लोअर स्टांडर्ड पास झाले.

मि० प्रिडो असि० कमिशनर यांस सेशन कोर्टाचे दिवाणी अपिलांचे निकालासाठीं मदतीस नेमिलें होतें परंतु त्यांस हल्लीं बुलढाण्यास डेपुटी कमिशनरचे जागीं नेमल्याचें कळतें.

बुलढाणा— वाशीम— जिल्ह्या करितां करितां नवीन सब डेपुटी इन्स्पेक्टरची जागा मंजूर झाल्यामुळें रा. रा गोविंदराव चिकाटे यांची नेमणूक होऊन उमरावतीस त्यांचे जागीं येथून रा. रा. उद्धव माधव वारे यांस धाडिलें व येथील सब डेपुटीचे जागीं रा. रा. गंगाधर रावजी सोहनी यांस नेमून रा रा. जनार्दन केशव नगरकर यांस तळेगांव दशसहस्त्रास जळगावाहून बदललें.

## वर्तमानसार.

gle copy ...



डांक लुटली—देराइस्मायलखान दरवडे खोरांनीं डांकेच्या स्वरांस अडवून थैल्या उठविल्या व आंतील नोटांची वगैरे लूट केली अस [illegible]

बडोदे—गायकवाड महाराजांनीं कौन्सल बंद केलें कारण बहुतेक खात्यांत लटपटी वाढल्या; व कामाचे भारे शिल्लक राहिले; ह्मणून महाराज सर्व काम स्वतःच पाहूं लागले.

हैद्राबादच्या निझाम सरकारचे जेष्ट चिरंजीव केवळ बारा वर्षांचे असून ते फारशी, आरबी, तेलंगी व उर्दू या चार भाषांत चांगलेच पारंगत झाले असून इंग्रजी अभ्यास मिडल पावेतों झाला आहे. ते म्याट्रिक परीक्षा पसार झाल्यावर पुढील अभ्यासा करितां विलायतेस जाणार. यांना घोड्यावर बसणें, नेम मारणें इत्यादि राजपुरूषत्वाचीं अंगें बरीच अवगत झालीं आहेत. यांनीं स्वतः असा बंदोबस्त ठेविला आहे कीं त्यांच्या आसपास कोणी स्त्री ह्मणून फिरकूं सुद्धां नये! यांच्या जवळ कोणा युरोपियनानें टोपी घालून जाऊं नये असा सक्त नियम आहे! साहेबांनीं टोपी काढून गेलें पाहिजे. परवां हुजूरचे ७०० रु. चे एक युरोपियन दरोगे टोपी काढून त्यांच्या पुढें न गेल्यामुळें सदरील युवराजांनीं त्यांना बडतर्फ केलें! आपल्यास पुनः कामावर घेण्या विषयीं सदर्हू साहेबांनीं हुजूर साहेबांस पुष्कळ विनविलें; परंतु हुजुरांनीं ती विनवणी मान्य केली नाहीं. हे राजपुत्र मोठे मार्मिक आहेत. ते हवा खाण्यास निघाले असतां कोणी फकीर त्यांस ह्मणाला कीं, "आपण बादशाहा असून आह्मांस एक पैसा देखील मिळत नाहीं." तेव्हां त्यांणीं आपल्या आजी कडून ५००० रुपये आणून सर्व फकिरांस वांटून दिले.

रजा घेणार—न्यायमूर्ति रानडे हे नोव्हेंबर व डिसेंबर ह्या दोन महिन्यांची रजा घेणार असून हायकोर्टांत मि. व्हिटवर्थ नगरचे जज्ज यांची अक. नेमणूक होणार अशी बातमी आहे.

टर्कीच्या लढाईच्या तयाऱ्या—कान्स्टांटिनोपल येथील आर्मीनियन लोकांचीं चर्चें सुलतानानें बंद केलीं आहेत. डार्डानेल्स येथील किल्यांची तपासणी करण्या करितां सुलतानानें एक मार्शल पाठविला असून तेथें टॉर्पेडोही पाठविले आहेत. स. शो.

कांहीं हत्यारबंद टर्की लोकांनीं अर्मेनियन लोकांवर हल्ला करून त्यांची कत्तल केली. अर्मेनियन दंग्याबद्दल चौकशी करा हे बड्या राजांचें ह्मणणें टर्कीनें कबूल केलें. आगळीक अर्मेनियन लोकांची आहे व त्यांणीं मुसलमानाची कत्तल केली टर्कीचें ह्मणणें आहे. अर्मेनियन लोकांच्या ज्या गुप्त खटपटी चालू आहेत त्याचाच हा परिणाम असून याहूनही हें प्रकरण वाढण्याचा संभव असल्यामुळें तुह्मी त्या खटपटी बंद करण्याकरतां झटा असें असें टर्कीनें बड्या राजांच्या वकिलांस बजावलें आहे.

अबीसीनियाचा राजा इटालीच्या फौजेवर चाल करून जात आहे. तेथील इटालियन फौजेच्या मदतीकरतां तें सरकार युरोपांतून नवी फौज पाठवीत आहे.

वायव्य प्रांतांत गुरांच्या चोऱ्या अलिकडे फार होऊं लागल्या आहेत असें सांगतात. अरुणोदय

मादागास्कर बेटावर फ्रेंचांनीं स्वारी करून तें बेट आपल्या ताब्यांत घेतलें. तेथील राज्य करणारी तरुण राणी व तिचे अधिकारी हे आपली राजधानी अंटानान रिव्हो ही सोडून अंबासिस्ट्रा येथें लपून राहिले आहेत. फ्रेंचसरकारचे लोक मादागास्कर बेटांतल्या जंगली तापांनीं फार मेले; व त्या सरकारास फार नुकसान पोचलें तसा हें बेट जसें नुकसान झालें मिळविल्यानें त्या सरकारास मोठासा फायदा झाला असेंही नाहीं. पहिल्यानें फ्रेंचसरकाराला वाटले होतें कीं, ही मोहीम अल्प श्रमानें व थोड्या खर्चानें पार पडेल. परंतु अजमासापेक्षां तें द्वीप काबीज करण्यास फ्रेंचसरकाराला फार श्रम व बहुत खर्च पडला. आतां मादागास्करच्या राणी बरोबर फ्रेंचसरकारचा तह झाला आहे. त्या तहांत राणीला अगदीं ताब्यांत बांधून घेतल्यासारखें केलें आहे. ही राणी मोठी शूर व धैर्याची आहे. तिणें आपल्यांत होता तितका दम धरून फ्रेंचांसारख्या बलिष्ट सरकाराशीं सामना केला. पण शेवटीं ती त्यांच्या हातीं सांपडली. तथापि, तें सरकार तिच्या धैर्यशौर्याबद्दल तिचा हेवा व तिरस्कार न करितां तिला उचित असणारा तिचा मानसन्मान ठेवून तिच्या राज्यांत स्वास्थ्य व समाधान हीं कायम राहतील अशी व्यवस्था ठेवतील अशी आशा आहे.

गायकवाडसरकारचा ठराव— बडोद्याचे असि. सर्व्हे सेटलमेंट ऑफिसर रा. रा. वासुदेव सदाशिव बापट यांजवर लांच खाल्याबद्दलच्या निकाल करण्यास बसलेल्या कमिशनाचे रिपोर्टावर गायकवाड सरकारांनीं ठराव करून निकाल दिला त्यांत बापटांवर आलेल्या व शाबीत झालेल्या ११ आरोपांतून त्यांस मुक्त केलें आहे. तथापि अशा मनुष्याची ह्या राज्यांत जरूर नसल्यामुळें त्यांस नौकरींतून काढून टाकलें आहे. असा ठराव रा. ब. जयसिंगराव अंग्रे अॅक्टिंग दिवाण, यांचे सहीनें प्रसिद्ध झाला आहे. येणेंप्रमाणें ह्या घाणेरड्या खटल्याचा निकाल करून गायकवाड सरकारानें आपले हात धुऊन टाकले हें बरें झालें. क्राफर्ड साहेबांला सरकारानें दोषमुक्त ठरविलें तरी त्यांस नौकरींतून दूर केलें. ही शिक्षा त्यांचे कर्मास कमी शासन झाली नाहीं. त्याच प्रमाणें बापटांस दोषमुक्त करून सेवामुक्त केलें हें शासन कांहीं कमी झालें नाहीं.

असें ह्मणतात कीं, येत्या वर्षी सुमारें ३,००० मैल रेल्वे बांधण्याचें काम सुरू होईल व सुमारें १,००० मैल रेल्वे उपयोगांतही येईल.

आफगाणिस्थानांत ६० लाख लोकांची वस्ती असून तिकडे एकही उपदेशक ख्रिस्ती मिशनरी नाहीं. परंतु हिंदुस्थानांत प्रत्येक २॥। लाख लोकांमागें एक आणि इराणांत प्रत्येक २० लाखांमागें एक येणेंप्रमाणें मिशनरी आहेत.

थोडे दिवसांपूर्वी रंगून येथें प्रदर्शनगृहांत असलेल्या एका मोठ्या सर्पानें दुसऱ्या तशाच एका सर्पास गिळून टाकलें. आपल्या बरोबरीच्या व सारख्याच लांबीरुंदीच्या प्राण्यास खाऊन गिळून टाकणारी एक सर्पजातीच समजण्यांत आली आहे.

पंजाबांत एक यूरोपिअन पोलीस इन्स्पेक्टर साहेब दौरा करण्यास निघाले ते एका ठाण्याच्या गांवीं रहदारी बंगल्यावर जाऊन उतरले. पण तेथें बघतात तों पंखा ओढण्यास कोणी मनुष्य नाहीं. तेव्हां साहेब बहादुरांस अतिशय क्रोध आला शेवटीं त्यांणीं तेथें आपल्या बरोबर असलेल्या देशी डेप्युटी पोलिस ईन्स्पेक्टराला पंखा ओढण्यास लावलें बरोबरच्या देशी अधिकाऱ्यांची योग्यता सदरील साहेब चांगली समजतात व ठेवतात असें दिसतें.

विद्युन्मनुष्य—नायागारा धबधब्याजवळील टोनावंडा नामक शहरांत एक ७ फूट उंचीचा लोखंडी पुतळा केला असून तो विजेच्या यंत्रानें नगरवीथींतून चालविण्यांत येतो. त्याच्या हातांत एक मोठा जाहिराती डकविण्याचा तक्ता दिलेला असून त्या तक्त्यावर भाड्यानें जाहिराती घेऊन डकविण्यांत येतात आणि त्या जाहिराती लोकांचे दृष्टीस पडाव्या ह्मणून हा चमत्कारिक रचनेचा विद्युन्मनुष्य रस्त्यांतून फिरविण्यांत येतो. पहिल्याच दिवशीं त्याचे भोंवतीं हजारों लोक जमले होते. हा पुतळा तयार करणाराचे मनांत असल्या प्रमाणें आतां त्याचे पोटांत एक फोनोग्राफ यंत्र ठेवून त्याचे योगानें तो पुतळा रस्त्यांतून मोठमोठ्यानें बोलत व ओरडत फिरत आहे असा तयार करण्यांत येणार आहे. ज्ञा. च.

रूस देशांतील एका चर्चांत ( ख्रिस्ती भजनालयांत ) ठेवलेली रत्नजडित कुमारी मेरीची तसबीर उपटण्यासाठीं रात्रींच्या वेळीं एक तस्कर शिरला. परंतु तेथील निजलेला पाद्री जागा होऊन त्याणें त्याला पकडलें. तों त्या चोराचे जवळ ५०,००० फ्रांक किंमतीची आणखी रत्नें सांपडलीं!

अमेरिकेंत एक बोगदा सोड बारा मैलांचा होणार आहे.

युवराज प्रिन्स ऑफ वेल्स यांस रोज ५००।६०० पत्रें येतात, असें सांगतात.

जुनें मंदीर—अलेप्पो शहराचे उत्तरेस उरफा नांवाचे नगरांत जमिनीच्या पोटांत एक जुनें देऊळ सांपडलें आहे. हें देऊळ काल्डिडन लोकांच्या वेळेंच आहे. हें स्थान प्रसिद्ध पुरुष इब्राहिम याची जन्मभूमि आहे. अतिशय जुन्या काळचें हें देऊळ पुराणेतिहासप्रियांस आपल्या रुचीला एक खाणेंच झालें आहे, असें ह्मटलें तरी चालेल.

एशिया मायनर पैकीं टॉर्सस येथील मिशनरी कॉलेजावर कांहीं आठवड्यापूर्वी मुसलमान लोकांनीं हल्ला केला; व तेथील विद्यार्थ्यास त्यांनीं फार वाईट रीतीनें वागविलें. त्या बदमाष लोकांस कुस्तुंतुनिया येथें पकडण्यांत आले आहे.

आस्ट्रेलियामध्यें न्यू साउथवेल्स पैकीं हॉलन्ड जवळील सोन्याच्या खाणींत एक सोन्याचा गट सांपडला, त्याचें वजन ३२० शेर होतें!

वृश्चिकदंशावर उपाय—बाभळीचा पाला चुरून त्याची चिलीम ओढल्यास विंचवाचें विष उतरतें.

उंदराचे कान फार तीक्ष्ण ह्मणजे मैक्रोफोनिक व टेलिफोनिक असतात त्यांना फार दुरचा व अगदीं हळू निघालेला आवाजही ऐकूं येतो.

इंग्लंडचें उत्पन्न—( लंडन ३० ) ग्रेटब्रिटनचें सहा माही उत्पन्न १८९४ च्या याच मुद्दती पेक्षां ४०००००० पौंडांनीं वाढलें आहे.

युद्धाची तयारी—( लंडन ३० ) रशिया व्हालिवास्टाकडे तोफा व इतर लढाईची सामग्री अजूनपर्यंत पाठवीत आहे.

एम. जीनटाड—यांची विजेची गाडी पारिस पासून बोर्डो व बोर्डो पासून पारिस पर्यंतच्या शर्यतीमध्यें होती. या गाडीची विद्युतशक्ति ७ अश्वबला बरोबरीची होती, गाडीची गति एका तासांत १४ मैल प्रमाणें होती. विद्युत्बल हें पेट्रोलियम किंवा दाबलेल्या हवे पेक्षां अधिक सोईचें आहे. इं. प्र.

वाई येथील झांजांच्या खटल्यांतील तेरा असामी पैकीं श्री. तात्यासाहेबपंत यांनीं मि. दुलेखान माजी पो. इ. व तुकाराम बहिरजी माजी चो. का. यांजवर डि. कोर्टांत द्वेषबुद्धीनें व बुद्धीपुरस्सर कारण नसतां आपलें नांव तिसरें खटल्यांत दाखल केलें त्यामुळें आपले अब्रूस आणखी शारीरिक व मानसिक स्थितीस धक्का बसण्यासारखें कृत्य केल्यामुळें नुकसानी बद्दल रु. १०१५ चा दावा केला आहे. त्या कामीं कायदेशीर मुद्यांचा निर्णय अ. जज्ज मे. फ्राय साहेब यां जकडे वादी तर्फे होऊन फक्त नुकसान देवविण्याच्या निर्णयाची तारीख ४।११।९६ ची नेमिल्याचें कळते. दी. बं.

लढाईची तयारी—तुर्कस्थानच्या सुलतानानें दार्डनेलच्या सामुद्रधुनीवरील किल्यांचा बंदोबस्त राखण्याचा हुकूम फर्माविला आहे. कान्स्टान्टिनोपल जवळील 'गेलेटा' नांवाच्या भागांत युरोपियन लोक राहतात ह्मणून तेथें बंदोबस्त ठेवण्यासाठीं युरोपच्या मोठ्या मोठ्या राष्ट्रांची लढाऊ जहाजें रवाना झालीं आहेत. अद्याप खुद्द कान्स्टान्टिनोपलमधील दंगा पूर्ण शांत झाला नाहीं.

काशीमध्यें कित्येक वर्षांपासून पोलीस व लश्कर यांच्यांत भांडण चालू असून, त्याचा भयंकर परिणाम कित्येकवेळीं घडला आहे. नुकाच तो दंगा पुन्हा झाला होता. हल्लीं सरकारि बंदोबस्त चालू आहे. कायमचा बंदोबस्त कां करण्यांत येत नाहीं?

मध्य आफ्रिकेंतील कांगो नदीकडे रहाणाऱ्या जंगली लोकांत माणसें खाण्याचा रिवाज आहे. त्याप्रमाणें त्यांनीं नुकाच एक युरोपियन स्वाहा केला. हे लोक, लढाईंत मेलेल्या आपल्या माणसांनाहि खातात. पण त्यामुळें लढाईंत पडलेल्या माणसांमुळें उत्पन्न होणारे रोग उद्भवत नाहींत असें ह्मणतात.

दंगा—आर्मेनियाचे शेजारील त्रेबीझांड येथील तुर्की लोकांनीं आर्मिनियांतील ख्रिस्ती लोकांवर हल्ला चालविला आहे. श्रीस. वि.

(धुळें) दंग्याचे खटले—या खटल्यांचा निकाल झाला. आरोपी नंबर १ मखन यास १ एक वर्षाची कैद. नंबर २ मखन याचा मुलगा इमाम यास दीड महिना. नंबर ३ रफू मोमिन यास दीड महिना. नंबर ४ अबदुल करीम, फिटर यास ६ महिने. नंबर ५ अबदुल अजीज मुल्ला, यास २००शें रुपये दंड आणि दंड न दिल्यास १५ दिवसांची कैद. आरोपी तर्फे मुसलमान बॅरिस्टर डिफेन्स देण्यास आले होते. आ.

☞ हे पत्र अकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.